रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १५९
www.ramprahar.com
◆शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदू युवकाची हत्या



**ढाका :** बांगलादेशमध्ये उसळलेल्या हिंसाचारात हिंदूंना लक्ष्य करण्याच्या घटना घडत आहे. काही दिवसांपूर्वी गारमेंट कंपनीत काम करणाऱ्या दीपू चंद्र दास या युवकाची जमावाने मारहाण करत निर्घृण हत्या केली होती. त्यानंतर आता राजबारी जिल्ह्यात बुधवारी रात्री उशिरा गावातील जमावाने एका हिंदू तरुणाला मारहाण करत ठार केल्याचे वृत्त डेली स्टारने पोलीस सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे. मैमनसिंग येथील भालुका परिसरातील २७ वर्षीय दीपू चंद्र दासची हत्या ईशनिंदेच्या आरोपाखाली करण्यात आली होती. दीपू हत्या झाल्यानंतर त्याचे पडसाद संपूर्ण भारतभर उमटले होते. अनेकांनी या घटनेचा निषेध करत बांगलादेशमधील राजकीय अस्थिरतेवर चिंता व्यक्त केली होती. त्यानंतर आता ही दुसरी घटना घडल्याचे कळते. मृत तरुणाचे नाव अमृत मंडल असल्याची माहिती मिळत असून अधिक तपास सुरू आहे.

अंतरंग
पाताळगंगा नदीत पडून तरुणाचा मृत्यू/२
वायू प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेची नियमावली/६
खेलरत्न, अर्जुन पुरस्कार; २५ खेळाडूंना नामांकन/८

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अखेर सेवेत

# परिसराच्या विकासाला मिळणार गती

**पनवेल, नवी मुंबई : वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन आणि उद्घाटन झालेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवारी (दि. २५) पहिल्या व्यावसायिक उड्डाणाचा ऐतिहासिक क्षण प्रवाशांनी अनुभवला. नोव्हेंबरपासूनच अनेकांनी पहिल्या प्रवासासाठी तिकीट आरक्षित केले होते. या उड्डाणाचे साक्षीदार होण्यासाठी प्रवाशांसह नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शविली.

सकाळी ८ वाजता बंगळुरूहून आलेले इंडिगोचे ६ए४६० हे विमान धावपट्टीवर



उतरले, तेव्हा पाण्याचे फवारे उडवून स्वागत करण्यात आले. इंडिगोच्या कर्मचाऱ्यांनी विमान उतरताच केक कापून आणि नारळ फोडून स्वागत केले. हा क्षण भावूक आणि आनंददायी असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली. त्यानंतर सकाळी ८.४० वाजता इंडिगोचे ६ए८८२ हे विमान हैदराबादसाठी रवाना झाले.

या विमानतळाची संकल्पना मांडली गेल्यापासून प्रत्यक्ष उड्डाणापर्यंतचा सुमारे २५ वर्षांचा प्रवास अखेर पूर्णत्वास गेला, याचे समाधान अनेकांच्या चेहऱ्यावर दिसून आले. प्रकल्पग्रस्तांना यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या त्यागावर हे विमानतळ उभे राहिल्याची भावना या वेळी व्यक्त झाली. विशेष म्हणजे भूमिपुत्रांचे दैवत लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे अनेकांनी स्मरण केले. त्यांचेच नाव या विमानतळाला देण्यात येणार आहे.

वार्षिक नऊ कोटी प्रवाशांची क्षमता असलेल्या या विमानतळावर पहिल्या वर्षी दोन कोटी प्रवाशांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १५ जानेवारीनंतर प्रतिदिन ४८ विमानांची ये-जा अपेक्षित आहे. या विमानतळामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरील भार कमी होईल, तर पनवेल, उरणसह नवी मुंबईच्या विकासाला गती मिळणार आहे. **(पान २ वर..)**



## श्रद्धेय अटलजींच्या विचारांचा वारसा पुढे नेऊया -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीत राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देत भारतीय लोकशाही अधिक बळकट केली. संवाद व सहमतीचा मार्ग त्यांनी नेहमी स्वीकारला. अटलजींच्या विचारांच्या वारसा पुढे नेण्याचा संकल्प आणि त्यांच्या आदर्शांवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली असल्याचे उद्गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे काढले.

भारताचे माजी पंतप्रधान, थोर राजनेते, कुशल वक्ते व कवीहृदयी व्यक्तिमत्त्व श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती गुरुवारी (दि. २५) पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

अभिवादन कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, कर्जतचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, नेरळ मंडळ अध्यक्ष नरेश मसणे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, पनवेल नगर परिषदेचे माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, कामगार नेते रवींद्र नाईक, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर यांच्यासह पक्षाचे

**▮ जयंतीनिमित्त अभिवादन**



पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी अटलजींच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळातील सुवर्ण चतुर्भुज महामार्ग योजना, पोखरण अणुचाचणी, ग्रामसडक योजना तसेच परराष्ट्र धोरणातील धाडसी व दूरदृष्टीपूर्ण निर्णय आजही स्मरणात राहणारे आहेत. राजकारण हे सत्तेसाठी नव्हे तर सेवेसाठी असते, हा संदेश त्यांनी आपल्या आचारातून दिला. कवी म्हणून त्यांनी लिहिलेल्या कविता समाजाला संवेदनशीलता व राष्ट्रप्रेमाचा संदेश देणाऱ्या ठरल्या, असेही त्यांनी नमूद केले.

## विमानतळाला ‘दिबां’च्या नावासाठी कृती समिती ठाम -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गुरुवारी अधिकृतपणे सुरू झाल्यानंतर या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे ही सर्वपक्षीय कृती समितीची ठाम भूमिका असल्याचे समितीचे उपाध्यक्ष, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्पष्ट केले आहे.



येथील विमानतळावरून पहिले प्रवासी विमान उड्डाण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि.बा. पाटील यांनी या परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी आणि त्यांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी शेवटपर्यंत संघर्ष केला. त्यांच्या या योगदानाची ओळख म्हणून या विमानतळाला ‘दिबा’साहेबांचेच नाव दिले पाहिजे ही आमची ठाम आणि रास्त मागणी आहे. या मागणीसाठी सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने तसेच स्थानिक भूमिपुत्रांच्या पुढाकारातून यापूर्वी विविध आंदोलने करण्यात आली. या आंदोलनांमुळे आमच्यावर अनेक केसेस झाल्या. गेल्याच महिन्यात या केससाठी मी आणि दशरथदादा पाटील यांच्यासह भूमिपुत्र उरणच्या कोर्टात हजर होतो. या संदर्भात आम्हाला जामीन घेण्याची ही वेळ आली तरीही आम्ही मागे हटलेलो नाही. ‘दिबा’साहेबांच्या नावासाठी आमचा पाठपुरावा अखंड सुरू आहे.

कृती समितीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आश्वासन दिले आहे की, या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल. कालही त्यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका ठामपणे मांडत लवकरच नामकरणाचा निर्णय होईल आणि विमानतळाला ‘दिबा’साहेबांचे नाव दिले जाईल, असे सांगितले आहे. त्यामुळे आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, ‘दिबा’साहेबांचे नाव या विमानतळाला लवकरच मिळेल, असा विश्वास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

आपल्या खासदारकीच्या काळातील आठवणी सांगताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, मी खासदार असताना सिडकोचे अधिकारी या प्रकल्पासंदर्भात मला भेटत होते. १९९८-९९पासून गेली तब्बल २५ वर्षे या विमानतळासाठी प्रयत्न सुरू होते, मात्र दीर्घकाळ प्रकल्पाला अपेक्षित गती मिळत नव्हती. नंतरच्या काळात फडणवीस सरकारच्या कार्यकाळात या विमानतळाला खऱ्या अर्थाने गती मिळाली आणि आज ते प्रत्यक्षात सुरू झाले आहे. विमानतळामुळे या संपूर्ण विभागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून उद्योग, व्यापार आणि आर्थिक विकासाला नवे बळ मिळेल. हे विमानतळ केवळ वाहतुकीचे केंद्रबिंदू नसून नवी मुंबई व रायगडच्या विकासाचा नवा अध्याय ठरणार आहे.

## निवडक

### कर्नाटकमध्ये भीषण अपघातात १७ जणांचा होरपळून मृत्यू

**चित्रदुर्ग :** कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यातील हिरियूरजवळ शुक्रवारी (दि. २५) पहाटे एका ट्रकने आराम बसला दिलेल्या धडकेत १७ जणांचा होरपळून मृत्यू, तर १५पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. ट्रक धडकल्यानंतर डिझेल टाकी फुटून ठिणग्या उडल्या आणि गोकर्णला निघालेल्या आराम बसला आग लागली. बसने पेट घेतल्यावर काही प्रवाशांना बस बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.

### अरवलीतील खनिजांच्या नवीन खाणपट्ट्यांवर केंद्राची बंदी

**नवी दिल्ली :** दिल्ली ते गुजरातपर्यंत पसरलेल्या संपूर्ण अरवली पर्वतरांगेचे अवैध खाणकामापासून संरक्षण करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलत केंद्र सरकारने राज्यांना अरवली पर्वतरांगेत कोणत्याही नवीन खाणपट्ट्या मंजूर करण्यावर संपूर्ण बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने एका निवेदनात पर्वतरांगेची अखंडता टिकवून ठेवण्यासाठी ही बंदी संपूर्ण अरवली प्रदेशात समान रीतीने लागू होणार असल्याचे म्हटले आहे.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## माथेरानमधील भाजपच्या विजयी नगरसेवकांना शुभेच्छा

### आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळींची घेतली भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माथेरान गिरीस्थान नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीने सत्ता मिळवली असून भाजपच्या विजयी उमेदवारांनी शुक्रवारी (दि. २५) आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात सदिच्छा भेट घेतली.

या वेळी भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, कर्जतचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, नेरळ मंडल अध्यक्ष नरेश मसणे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माथेरानमध्ये भाजपचे तीन उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये प्रतिभा प्रदीप घावरे, संतोष अरविंद शेलार, प्रियांका विनोद कदम यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे तेथे भाजपचे कमळ पहिल्यांदाच फुलले असून नवनिर्वाचित नगरसेवकांचे आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

## सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वे जाम

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

ख्रिसमस अर्थात नाताळ, त्यानंतर शनिवार, रविवार आणि पुढे सरत्या वर्षाला निरोप देऊन नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक बाहेर फिरायला निघाले. त्यामुळे शुक्रवार (दि.२५) पासूनच मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पहायला मिळाले.



एक्सप्रेस वेवर बोरघाटात पुणे लेनवरील अमृतांजन ब्रिजपासून पाच ते सहा किमीपर्यंत वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. वाहतूक कोंडीमुळे अवघड वळणावर वाहने बंद पाडण्याच्या घटना घडल्या. महामार्ग पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी धाव घेतली. प्रवासापूर्वी वाहतुकीच्या स्थितीची माहिती घेऊनच प्रवाशांनी बाहेर पडावे, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, मिसिंग लिंकचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, जेणेकरून वाहतूक कोंडीतून सुटका होईल, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

## पर्यटकांची पावले निसर्गरम्य माथेरानकडे...!

**माथेरान : संतोष खाडे**

रायगड जिल्ह्यातील प्रदूषणमुक्त, निसर्गरम्य परिसर व हिरवीगार वनराई आणि शांत वातावरणासाठी प्रसिद्ध असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी नाताळच्या सुट्ट्यांमुळे पर्यटकांची रेलचेल वाढू लागली आहे. नाताळसह नववर्षाचे स्वागत करण्यासाठी येथील हॉटेल्स, लॉजमध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर बुकिंग येथे होत आहे.

मुंबई आणि पुण्याच्या हाकेच्या अंतरावर माथेरान पर्यटनस्थळ असल्याने निसर्गप्रेमी पर्यटकांची माथेरानला पहिली पसंती मिळत असते. शहरातील धकाधकीपासून दूर, शांत व प्रदूषणमुक्त वातावरणात सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटक नाताळच्या सुट्ट्या सुरू होताच मोठ्या संख्येने माथेरान पर्यटनस्थळी दाखल होत आहेत. हॉटेल्स व लॉजधारकही पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, आकर्षक सजावट, विशेष



जेवणाचे मेनू, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच संगीत-मनोरंजनाची तयारी करून पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले असून सर्व सेवा-सुविधांवर विशेष भर दिला जात आहे.

नाताळ सुट्यांमधील शनिवार, रविवार तसेच ३१ डिसेंबरच्या दिवशी हॉटेल्स व लॉजिंगमध्ये ऐनवेळी खोल्या मिळणे कठीण होत असल्याचे चित्र असते. त्यामुळे बहुतेक पर्यटकांनी आधीच बुकींग केली असून अनेक ठिकाणी हाऊसफुल स्थिती निर्माण झाली आहे. काही हौशी पर्यटकांकडून निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी टेंट स्टेचीपण मोठी मागणी होत असल्याची माहिती हॉटेल व्यवस्थापनाने दिली.

सध्याच्या घडीला माथेरान गिरीस्थान पर्यटनस्थळी पर्यटकांची लगबग दिसून येत आहे. येथील निसर्गरम्य परिसरात जंगल सफारी, ट्रेकिंगस्थानिक पदार्थांचा आस्वाद, शेकोटी याचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांचा ओघ माथेरान पर्यटनस्थळी वाढत आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायाशी निगडित सर्व घटकांच्या चेहऱ्यावर आनंद झळकताना दिसत आहे.

> नाताळ पर्यटन हंगामाकरिता पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. हा माहौल नक्कीच येथील हॉटेल आणि लॉजिंग व्यवसायिकांकरिता लाभदायक ठरणार आहे.
>
> **-शैलेश चाफेरकर,** हॉटेल व्यवस्थापक

> माथेरानमध्ये पर्यटकांची गर्दी आता दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. अनेक दुकानदारांनी आपल्या दुकानात भरपूर नवीन माल आणला असून आपली दुकाने सजवून येणाऱ्या पर्यटकांच्या सेवेसाठी आम्ही सज्ज झालो आहोत.
>
> **-पवन गडवीर,** ज्यूट बॅग दुकानदार



**पनवेल : सध्या शाळा-महाविद्यालयांची स्नेहसंमेलने होत असून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाचे स्नेहसंमेलन बुधवारी रंगले. या वेळी विद्यार्थ्यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. (वृत्त पान ३वर..)**

# नगरपंचायत-महामार्ग प्राधिकरणाच्या वादात माणगाव शहरातील गटारे तुडुंब

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील मोरबा रोड परिसरातील नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि जीवनमान धोक्यात आणणारी गंभीर समस्या गेली पाच वर्षे प्रलंबित आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मोरबा रोडवरील रस्त्याच्या दुतर्फा गटारे बांधली असली, तरी नगरपंचायत आणि महामार्ग प्राधिकरण यांच्यातील जबाबदारीच्या वादामुळे या गटारांची गेल्या पाच वर्षांत एकदाही नीट साफसफाई झालेली नाही. परिणामी ही गटारे आज कचरा, गाळ व सांडपाण्याने तुडुंब भरली असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. डासांची मोठ्या प्रमाणावर पैदास होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

दिघी-माणगाव-पुणे हा महत्त्वाचा महामार्ग मोरबा रोड मार्गे माणगाव शहरातून जातो. सन २०२० मध्ये हा महामार्ग पूर्ण झाला असला, तरी त्यासोबत बांधण्यात आलेली गटारे अनेक ठिकाणी आजही अर्धवट अवस्थेत आहेत. काही ठिकाणी ही गटारे पूर्णपणे उघडी असून त्यांची खोली सुमारे पाच फूट आहे. अंधारात किंवा पावसाळ्यात या उघड्या गटारांमध्ये पडून अपघात झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. याबाबत नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही संबंधित यंत्रणांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



गटारांची कामे अपूर्ण असल्याचे कारण देत माणगाव नगरपंचायतीने साफसफाईची जबाबदारी टाळली, तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने वारंवार सूचना आणि तक्रारी करूनही या प्रश्नाकडे पाठ फिरवली. या निष्काळजीपणाचा फटका थेट शेतकऱ्यांना बसला आहे. गटारांमधील तुंबलेले सांडपाणी थेट खांदाड परिसरातील शेतजमिनीत सोडण्यात आल्याने हजारो हेक्टर शेती बाधित झाली आहे. भातशेती व कडधान्यांची पिके नापीक झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची मागणी केली असली, तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. पावसाळ्याच्या काळात या तुंबलेल्या गटारांमुळे परिस्थिती आणखी भयावह होते. खांदाड, मोरबा रोड, सिद्धीनगर, एसटी बसस्थानक परिसर आणि बामणोली रोड या भागांत दरवर्षी पुरसदृश परिस्थिती निर्माण होते. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य, फर्निचर आणि घरांची संरचना यांचे मोठे नुकसान होते. वर्षानुवर्षे होणाऱ्या या त्रासामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी वेळोवेळी आवाज उठवला. मात्र, आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कृती न झाल्याने नागरिकांचा विश्वास ढासळत चालला आहे.आता संयमाचा बांध सुटण्याच्या मार्गावर असून, मोरबा रोडवरील गटारांची तातडीने साफ सफाइ करण्याची मागणी केली आहे

> माणगावमधील गटार सफाईच्या कामाला आपण नगरपंचायतीचे सफाई कामगार लावून बामणोली रोडपासून सुरुवात केली आहे. शहरातील मोर्बा रोड मार्गासह सर्व गटारांची स्वछता लवकरात लवकर करण्यात येईल.
>
> **- संतोष माळी, मुख्याधिकारी नगरपंचायत, माणगाव**

## माथेरान नगरपालिका गटनेतेपदी शिवाजी शिंदे

**माथेरान : प्रतिनिधी**



माथेरान नगरपालिका निवडणुकीच्या निकालाची नुकतीच प्रतीक्षा संपली असून स्थानिक आमदार महेंद्र थोरवे आणि रायगड जिल्हा निवडणूक प्रमुख भाजप आमदार प्रशांत ठाकूर तसेच समस्त महायुती मधील कार्यकर्ते व सहकारी यांच्या पाठबळामुळे महायुतीला घवघवीत यश मिळाले असून वीसपैकी पंधरा जागेवर महायुतीने विजय संपादन करून माथेरान पालिकेवर महायुतीची एकहाती सत्ता स्थापन केली आहे.

यामध्ये जवळपास सगळेच तरुण उमेदवार आणि नवीन चेहरे नगरसेवकपदी विराजमान झाले आहेत. सलग तीन वेळा नगरसेवकपदी निवडून येणारे शिवसेना शिंदे गटाचे शिवाजी शिंदे यांची माथेरान नगरपालिका गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बुधवारी दि.२४ रोजी आमदार महेंद्र थोरवे यांच्या निवासस्थानी सर्व विजयी उमेदवारांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. या वेळी माथेरानमध्ये सलग तीन वेळा नगरसेवकपदी निवडून येणारे आपली विजयाची हॅट्ट्रिक साधणारे नगरसेवक शिवाजी शिंदे यांची माथेरान नगरपालिका गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. नगराध्यक्षपदी निवडून आलेले चंद्रकांत चौधरी सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका आणि महायुतीचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. शिवाजी शिंदे यांची गटनेतेपदी नियुक्ती होताच माथेरान मधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात असून सर्व नगरसेवक आणि नगरसेविका तसेच नगराध्यक्षपदी विराजमान झालेले माथेरानकरांचे लाडके, किंगमेकर नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## पाताळगंगा नदीत पडून तरुणाचा मृत्यू

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

वाशिवली येथील संदिप दिनेश पाटील (वय ३५) याला गेल्या चार वर्षापासून फिट येत होती. संदिप पाटील हा सकाळी उठून वाशिवली येथील पाताळगंगा नदीच्या काठावर शौचास गेला असता त्याला फिट आल्याने तो पाताळगंगा नदी पात्रात पडला. त्यास आसपासच्या नागरिकांनी उपचारासाठी ग्रामीण रुणालय चौक येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासणी करून संदिपला मयत घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्यात नोंद झाली असून उपनिरीक्षक अनुसया ढोण`करीत आहेत.

## महाडमध्ये भरधाव गाडी हॉटेलमध्ये शिरली; शेडचे नुकसान

**महाड : प्रतिनिधी**

महाड-रायगड मार्गावर महाडकडे येणाऱ्या झायलो कारचालकाने कुत्र्याला वाचवण्याच्या प्रयत्नात ब्रेक दाबला असता कार अनियंत्रित होऊन रस्त्याकडे असलेल्या घरालगत साकारलेल्या हॉटेलसमोरील शेडवर जाऊन पलटी झाली. या अपघातामध्ये घरासमोरील शेडचे अतोनात नुकसान झाले असले तरी घरमालकाने महाड तालुका पोलीस ठाण्यात अद्याप तक्रार दाखल केली नाही.



महाड-रायगड मार्गाचे काम सुरू असून येथील अक्षय कंट्रक्शन च्या इंजिनीयरला आणण्यात निघालेल्या झायलो कार क्रमांक एमएच ०६ बीइ ९४३३च्या चालकाने समोर आलेल्या कुत्र्याला वाचवण्याच्या प्रयत्नात ब्रेक दाबला आणि गाडी अनियंत्रित होऊन शेजारी असलेल्या घरासमोरच्या शेडला जाऊन आदळली.

या अपघातामध्ये घराच्या शेडचे पूर्णतः नुकसान झाले असून चालक अमर गणेश तिवारी हा किरकोळ जखमी झाला आहे. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यामध्ये कोणतीच तक्रार दाखल झाली नसली तरी घटनेचे वृत्त समजताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पोलीस दप्तरी नोंद केली आहे.

## मुंबई-पुणे मार्गावर क्रेन उलटून एक जण ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

अतिवेगात जाणारी क्रेन पलटी झाल्याने पादचारी इसम चमन शिवकुमार यादव याचा मृत्यू झाल्याची घटना खालापूर हद्दीत मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर घडली. क्रेन चालक नागेश शिवाजी सावंत वय २१ रा. गोरेगाव मुंबई हा त्याच्या ताब्यातील क्रेन घेवून जुन्या मुंबई पुणे महामार्गावरून जात असताना लोधीवली गावचे हद्दीतील लोधीवली टाउनशिप समोर वळणावर क्रेन अनियंत्रित झाल्याने क्रेन रोडचे डावे बाजुस पलटी झाली.

रोडवर उभा असलेला पादचारी चमन शिवकुमार यादव यास क्रेनची धडक लागुन त्याचे हातापायास लहान मोठया गंभीर स्वरुपाच्या दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला.अपघातात क्रेन चालक नागेश देखील जखमी झाला असून त्याच्या वर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे क्रेन चालक नागेश सावंत वर गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे हे करीत आहेत.

## नवी मुंबई पालिकेने बनवलेले खत झाले ब्रँडेड

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात निर्माण होणारा ओला कचरा व सुका पालापाचोळा या विघटनशील कचऱ्यावर प्रक्रिया करुन तयार होणाऱ्या सेंद्रिय खताची विपणन व विक्री करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हरित महासिटी कंपोस्ट हा अधिकृत व राज्य-नोंदणीकृत ब्रँड आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी ओल्या कचऱ्यापासून निर्माण होणाऱ्या खताच्या विपणन व विक्रीकरीता महाराष्ट्र शासनाचा हरित महासिटी कंपोस्टहा हरित ब्रँड वापरण्यास परवानगी प्राप्त झालेली आहे. यामुळे देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीत समाविष्ट असणाऱ्या नवी मुंबई शहराला महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी एक विशेष मानांकन लाभले आहे.

हरित महासिटी कंपोस्टहा ब्रँड महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या पुढाकाराने शहरी ओल्या कचऱ्यापासून तयार होणाऱ्या सेंद्रिय खताचा प्रचार व विपणन करण्यासाठी विकसित करण्यात आला आहे. हा ब्रँड राज्य कचरा व्यवस्थापन नियम तसेच खत नियंत्रण आदेश अंतर्गत निर्धारित केलेल्या गुणवत्ता मानकांचे काटेकोरपणे पालन करतो. नवी मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी निर्माण होणारे सेंद्रिय खत त्या गुणवत्तेचे ठरले आहे. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या कचऱ्यापासून निर्माण होणारे खत हे आता हरित महासिटी कंपोस्टया विशेष ब्रँडने ओळखले जाणार आहे. या ब्रँडव्दारे उच्च दर्जाचे सेंद्रिय खत विक्रीसाठी उपलब्ध करून देता येणार असून, क्षेपणभूमीमध्ये जाणारा कचरा लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होत आहे. तसेच मातीची सुपिकता वाढवून, वनस्पतींचे आरोग्य सुधारण्यातून शाश्वत शेतीला चालना मिळत आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या तुर्भे क्षेपणभूमी येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये नागरी घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करुन दैनंदिन सरासरी ३० ते ४० मेट्रिक टन सेंद्रिय खताची निर्मिती करण्यात येत आहे.

या सेंद्रिय खताचा वापर नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये केला जात आहे. तसेच हे सेंद्रिय खत शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यातून शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक व गुणवत्तापूर्ण खताचा लाभ होत आहे.नवी मुंबई महानगरपालिका पर्यावरण संवर्धन, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रयत्नशील असून, त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी कचऱ्यापासून निर्माण होणाऱ्या खतास हरित महासिटी कंपोस्ट ही ब्रॅण्डेड ओळख प्राप्त झाल्याने ही नवी मुंबई महानगरपालिकेसाठी विशेष उल्लेखनीय अभिमानाची गोष्ट आहे.

## स्व. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त खारघरमध्ये सुशासन दिन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कोट्यवधी कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान, भारतीय राजकारणातील अजातशत्रू, सुशासनाची प्रतिमूर्ती आणि भारतरत्न माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी निमित्त भारतीय जनता पार्टी खारघर मंडळाच्या वतीने 'सुशासन दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.



या वेळी मंडळाचे महासचिव दीपक शिंदे यांनी अटलजींच्या कार्याचा तसेच 'सुशासन दिना'च्या महत्त्वाचा सविस्तर ऊहापोह केला. अटल बिहारी वाजपेयी यांनी सशक्त, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या निर्मितीसाठी आपले संपूर्ण जीवन राष्ट्रसेवेस अर्पण केले, असे त्यांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेपासून लाखो-कोट्यवधी कार्यकर्त्यांना घडवत त्यांनी राष्ट्रवादाची चेतना जनमानसात रुजवली. पंतप्रधान म्हणून त्यांच्या कार्यकाळात पोखरण येथील अणुचाचण्या, सुवर्ण चतुष्कोण महामार्ग प्रकल्प तसेच कारगिल युद्धातील भारताच्या विजयामुळे जागतिक पातळीवर भारताची सामरिक व विकासात्मक ताकद अधोरेखित झाली. राष्ट्रोत्थान, सुशासन आणि गरीब कल्याण यासंदर्भातील अटलजींचे विचार आजही देशाला दिशा देणारे आहेत. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारत' घडवण्याच्या संकल्पाला अटलजींच्या विचारांतून सातत्याने नवी ऊर्जा मिळत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी अटलजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. ।

या कार्यक्रमास शत्रुघ्न काकडे, दीपक शिंदे, संध्या शारबिद्रे, नितेश पाटील, निर्मला यादव, प्रिया दळवी, दुर्गा अंजुरे, प्रविण बेरा, अक्षय लोखंडे, प्रथम पाटील, भागवत गायकवाड, गजानन इंदुलकर, झुमा चक्रवर्ती, किरण पाटील, नेत्रा पाटील, वासुदेव पाटील, अनिता पाटील, ब्रिजेश पटेल, साधना पवार, कुणाल संघाणी, राजेंद्र मांजरेकर, संदीप कासार, किशोर जाधव, आशीष पटेल, रमेश सोरथिया, जयेश घड़िया आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ अखेर सेवेत

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्याबद्दल माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी आनंद व्यक्त केला. पहिल्याच दिवशी त्यांनी कुटुंबासह येथून विमानप्रवास केला. ते म्हणाले, हा सन्मान मला मिळाला, पण दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळात आपले स्वागत आहे, अशी घोषणा झाली असती तर आनंद अधिक झाला असता. विमानतळाच्या नामकरणाबाबत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास व्यक्त करत योग्य निर्णय लवकर होईल अशी अपेक्षाही व्यक्त केली. नाईक यांच्यासह 'दिबां'च्या कुटुंबातील काही सदस्यांनीही आपल्या झुंझार नेत्याचा फोटो हातात घेऊन विमान प्रवास केला आणि सरकार याबाबत सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त केला.



## मतदार जनजागृतीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत वॉकथॉनला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत डी.डी. विस्पुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, न्यू पनवेल येथे मतदार जनजागृतीसाठी आयोजित करण्यात आलेल्या वॉकथॉनला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात १०० पेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.




वॉकथॉनचे उद्घाटन आणि फ्लॅग-ऑफ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधीही उपस्थित होते.यावेळी सर्वांनी मी मतदान करेन आणि इतरांनाही मतदानासाठी प्रेरित करेन अशी मतदार जनजागृती प्रतिज्ञा घेतली.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्या सीमा कांबळे म्हणाल्या, मतदान हा फक्त अधिकार नाही, तर समाजाप्रती असलेले कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची रुजवात झाली तर उद्या ते सजग व जबाबदार मतदार म्हणून उभे राहतील. या वॉकथॉनचा उद्देश नागरिकांपर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवणे आणि मतदानाबाबत जागरूकता वाढवणे हा आहे, वॉकथॉन डी डी विस्पुते कॉलेज ऑफ एज्युकेशन पासून सुरूवात झाली.

त्यानंतर अशोक अपार्टमेंट, सेक्टर १५ - न्यू केअर प्लस हॉस्पिटल, तिथुन रस्ता - मँगो गार्डन - मँगो गार्डन स्ट्रेट - पोदी गाव पार्क - कॅफे ३ डी - पिल्लेज गर्ल्स हॉस्टेल - तिथुन रस्त्याने परत - डी डी विस्पुते कॉलेज ऑफ एज्युकेशनजवळ वॉकेथॉनची सांगता झाली.

## गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेऊन जात असलेले गोमांस गाडीसह पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** पळस्पे गावाजवळील पुलावर पनवेल शहर पोलिसांनी जागृत नागरिकांच्या मदतीने एक झायलो गाडी ताब्यात घेतली असून त्यामध्ये गोवंश जातीचे चार बैलाची गैरकायदेशीर कत्तल करून त्यांचे मांस महाड येथून गोवंडी मुंबई येथे गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेवून जात असताना ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी तिघा जणांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल जवळील पळस्पे गावासमोरील पुलावर पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने झायलो गाडी क्रं.एमएच-०४-डीवाय-२४२१ ही अडवून तिची तपासणी केली असता या गाडीमध्ये गोवंश जातीचे चार बैलाची गैरकायदेशीर कत्तल करून त्यांचे मांस महाड येथून गोवंडी मुंबई येथे गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेवून जात असताना ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी तिघा जणांसह झायलो गाडी व कत्तल केलेले मांस असा एकूण ३ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

## पुरस्कारप्राप्त नाटक 'इतना सन्नाटा क्यू है भाई?'चे बोरीवली व ठाण्यात प्रयोग

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या हौशी राज्य नाट्य स्पर्धेत प्राथमिक फेरीतच हाऊसफुल प्रयोग करत तांत्रिक विभागात तीन पुरस्कार पटकावलेल्या इतना सन्नाटा क्यू है भाई? या दोन अंकी नाटकाला रसिक प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. या भरभरून प्रतिसादाला मान देत रिफ्लेक्शन थिएटर, पनवेल पुन्हा एकदा हे लोकप्रिय नाटक प्रेक्षकांसमोर सादर करत आहे. रोहा येथील यशस्वी प्रयोगानंतर तसेच यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथील प्रयोगानंतर आता हे नाटक मुंबई व ठाण्यात सादर होणार आहे. शुक्रवार, २६ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता बोरिवली येथील प्रबोधनकार ठाकरे (मिनी) नाटचगृहात, तर शनिवार, २७ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर(मिनी) नाट्यगृहात नाटकाचा प्रयोग होणार आहे.

# विहीघर येथील मुख्य रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नातून आणि २५-१५ ग्रामीण विकास निधीतून विहीघर येथील मुख्य रस्त्यावरील समोरच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. या विकासकामासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, या कामाचे भव्य भूमिपूजन भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते गुरुवारी (दि. २५) उत्साहात पार पडले.



विहीघर येथील हा रस्ता मुख्य रहदारीचा भाग असून याच्या दुरुस्तीसाठी आमदार प्रशांत ठाकूरयांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिला. यावेळी अरुणशेठ भगत यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांची गंगा वाहत आहे. येणाऱ्या काळातही या भागात अशाच प्रकारे जनहिताची विकासकामे राबवली जातील. असा विश्वास व्यक्त करून हा रस्ता दर्जेदार आणि मजबूत व्हावा यासाठी संबंधित ठेकेदाराला सूचना दिल्या.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाला प्राधान्य दिले आहे. विहीघरमधील या अंतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरणामुळे हा मार्ग आता अधिक टिकाऊ होणार आहे. याचा सर्वाधिक फायदा शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन तरुण आणि नोकरदार वर्गाला होणार आहे.

या कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते संजय पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, भाजप युवामोर्च्याचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, युवामोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, उपसरपंचमुकेशफडके, नामदेव धाऊ, बाळाराम पाटील, सुधीर फडके, सुदाम फडके, अनंता पाटील, संदेश फडके, अक्षय पाटील, मिथुन पाटील, प्रदीप फडके महाराज, सुरेश महाराज, गोपीनाथ महाराज, सोमनाथ पाटील, सोमनाथ फडके, ज्येष्ठ नेते लडकू पाटील, नामा पाटील महाराज, बाळाराम फडके महाराज, मनोज फडके, रमेश फडके, मिनाथ पाटील, संकेत पाटील, साई पाटील, करण पाटील, पार्थ पाटील, साहिल पाटील, मनीष झा, बबन बोरकर, दिग्वीजय पांडे, दीपक अग्रवाल, राजेंद्र कोरडे, नरेश फडके, संतोष हरड, सौरवपाटील, अक्षय पाटील, श्री. गायकवाड, राममूर्ती बेरवाल, नितीन भगवान पाटील, नितीन नामदेव पाटील, चांगदेव पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विहिघर, महालक्ष्मी सिटी, प्रयाग सिटी, लक्ष्मी नगर मधील रहिवासी उपस्थित होते.

## पनवेल तहसील कार्यालयाचा सर्व्हर डाऊन; उमेदवारांचा खोळंबा

**पनवेल : वार्ताहर**

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना निवडणुकीच्या रिंगणात उत्तरु इच्छिणार्या इच्छुक उमेदवारांना प्रतिज्ञापत्र तयार करून घेताना पनवेल तहसील कार्यालयात अडथळे येत आहेत.

काही दिवसांपासून सव्हर डाऊन असल्यामुळे त्यांच प्रतिज्ञापत्र तयार होऊ शकलेले नाही. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणार्या उमेदवारांची, तसेच विविध कामे घेऊन येणार्या नागरिकांचीही गैरसोय होत आहे.

पनवेल तहसील कार्यालयात सर्वार डाऊन असण्याची समस्या अनेकदा जाणवत असते. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. सध्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे. आतापर्यंत जवळपास ५०० निवडणूक अर्जाची विक्री झाली आहे.

परंतु अद्यापही एकाही उमेदवाराने अर्ज भरलेला नाही, तरी उमेदवारांकडून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. अर्ज भरताना विविध कारणांसाठी उमेदवारांना प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे असते. महसूल विभागाच्या माध्यमातून पनवेल पालिका क्षेत्रातील उमेदवारांसाठी पनवेल तहसील कार्यालयातून प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. इच्छुक उमेदवारांसह विद्यार्थी, जन्माचा दाखला , डोमिसिएल , भाडॅ करार इतर दाखले घेण्याची कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांची सेतू कार्यालयात गर्दी होत आहे, परंतु ऑनलाइन प्रतिज्ञापत्र तयार करण्यात येणार्या वेबसाइटचा सर्वर डाऊन असल्यामुळे अनेक उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांना ताटकळत थांबावे लागते आहे. थांबुन हि प्रतिज्ञापत्र मिळू न शकल्यामुळे उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. सर्वारमुळे उमेदवारांचा आणि नागरिकांचा खोळंबा होत आहे. त्यामुळे याबाबत निवडणुक आयोगाने याची दखल घेउन योग्य ती कारवाइ करण्याची मागणी करण्यात येत आहे



पनवेल : दैनिक क्षितीज पर्वचे प्रकाशन गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी लोकशाही पत्रकार समितीचे अध्यक्ष शंकर वायदंडे, कार्याध्यक्ष तथा दैनिक क्षितीज पर्वचे संपादक सनिप कलोते, उपाध्यक्ष गणपत वारगडा, मयूर तांबडे, अक्षय कांबळे, शेलेश चव्हाण, खजिनदार सुनील वारगडा, सचिव दिपाली पारसकर, सहसचिव प्रेरणा गावंड, प्रसिद्धी प्रमुख कृष्णा गायकवाड, सदस्य प्रकाश मत्रे, जितेंद्र नटे, अजय दुबे उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कलोते यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



कळंबोली : देशाचे माजी पंतप्रधान, भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या अनुषंगाने गुरुवारी सकाळी कळंबोली भाजप कार्यालयात प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सर्वांनी जयंतीनिमित्त अभिवादन केले.

# विद्यार्थ्यांनी उत्तम ज्ञान संपादन करुन नावलौकिक मिळवावा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी उत्तम ज्ञान संपादन करुन वेगवेगळ्या क्षेत्रात कलागुणांनी नावलौकिक मिळवावा हेच शाळेचे ध्येय आहे. आत्तापर्यंत या संस्थेचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात स्वत:च्या कर्तृत्त्वाने गगनभरारी घेत आहेत, आपणही त्यांच्या पावलावर पाऊल टाकत यश संपादन करावे असा सल्ला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सीकेटी विद्यालयाच्यावतीने आयोजित स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांना दिला. त्याचबरोबर उत्तरोत्तर होणाऱ्या शाळेच्या प्रगतीवर समाधान व्यक्त करत पालकांचे विद्यार्थ्यांचे त्याचबरोबर त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले.



पाहुण्यांच्या हस्ते प्रेरणादायी व्यक्तीमत्त्वावर साकारलेल्या थोर व्यक्तींवर आधारित प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाचा वार्षिक अहवाल 'मयुखा' चे प्रकाशन करण्यात आले. शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यालयाच्या प्रगतीतील महत्त्वाच्या टप्प्यांना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे, विशेष आकर्षण म्हणजे चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या संकल्पनेतूनसाकारलेले 'समाजासाठी साहेब करती जीवाचे रान' ह्या संगीतपुष्पाची, सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या शिक्षकवृंदांच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनपटावर आधारीत गीताची सदिच्छा भेट दिली.

त्याचबरोबर तिसरीचा विद्यार्थी रुद्र पाटील या विद्यार्थ्याने आपल्याभाषणातून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जन्मापासून आतापर्यंतच्या अतुलनीय कार्यबद्दल विचार व्यक्त केले. यावेळी डॉक्टर जयकुमार भंडारकर यांनी मुलींच्या पालकांना आपल्या मुलींच्या तब्बेतीची काळजी घेऊन कशी निगा राखावी याबाबत मार्गदर्शन केले. या सोहळ्यात आंतरशालेय, राज्य आणि जिल्हास्तरावर झालेल्या स्पर्धा तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उज्ज्वल यश संपादन करून प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्याना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्माचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांना कला चिल्ड्रेन अकॅडमीतर्फे द बेस्ट हेडमिस्ट्रेस अवॉर्ड व सप्तरंग अकॅडमी तर्फे गुरुगौरव पुरस्कार त्याचबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीयकामगिरी केलेल्या शिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, भंडारकर हॉस्पिटलचेप्रमुख डॉक्टर जयकुमार भंडारकर, पनवेल महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, पंचायतसमितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक समीर ठाकूर, वर्षा नाईक, संस्थेच्या कार्यकारी संचालक मंडळाचेसदस्य अनिल भगत, सदस्या वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, सचिव डॉक्टर सिद्धेश्वर गडदे, सदस्य स्वप्निल ठाकूर, राहुलघरत, एकच राजा इथे जन्मला फेम गायक रोहित पाटील, रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघरच्या प्राचार्या निशा नायर, सी.के.टी.ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षिक अजित सोनवणे, अभिषेक पटवर्धन, साधना ठाकूर, विभूतीसिन्हा, मुख्याध्यापक कैलास सत्रे, संतोष चव्हाण, सुभाष मानकर, मुख्याध्यापिका निलिमाशिंदे, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, नीरजा अधुरी, वैशाली पारधी, जसप्रीत सिंग, प्रिया नायर, योगिनीमाने, विद्या जाधव, प्रीती जैन विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मिसमॅच डे उत्साहात साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवार दिनांक २४ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता सांस्कृतिक समितीच्या वतीने 'मिसमॅच डे' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शैक्षणिक जीवनात उत्साह, सर्जनशीलता आणि आनंद निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या दिवशी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या रंगांचे, शैलीचे व कल्पकतेने निवडलेले पोशाख परिधान करून महाविद्यालयीन परिसरात रंगत आणली पारंपरिक व आधुनिक पोशाखांचे अनोखे मिश्रण, हटके अ‍ॅक्सेसरीज आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे महाविद्यालयात आनंदी वातावरण निर्माण झाले.

सदर कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता, आत्मअभिव्यक्ती आणि आत्मविश्वास दाखवला. सांस्कृतिक समितीच्या सदस्यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले.

अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये एकोपा, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक जाणीव वाढीस लागते, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

मिसमॅच डे' मुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या ताणातून थोडा विरंगुळा मिळाला आणि महाविद्यालयीन जीवन अधिक रंगतदार झाले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या मिसमॅचडेचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केली तसेच सांस्कृतिक समितीतील इतर सर्व सदस्य,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.



## प्रशिक्षणार्थी, कर्मचाऱ्यांना खाद्यपदार्थ पुरविण्यासाठी निविदेचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल या शासकीय शैक्षणिक संस्थेच्या आवारात एकूण पाच इमारत असून एक हजार १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना येथे व्यवसाय शिक्षण दिले जाते.


याकरीता उपलब्ध असलेला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग जवळ जवळ ९९ च्या आसपास असून या प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जेवण व अल्पोपहार तसेच इतर खाद्य पदार्थ स्वच्छ व स्वस्त दरात संस्थेच्या आवारात उपलब्ध करुन द्यावयाचे असल्याकारणाने शासनाने प्रचलित खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून महिला गटाच्या आहार व्यवस्थापक ठेकेदारास ज्यांना महाराष्ट्रीयन पध्दतीचे जेवण, अल्पोपहार, चहा, कॉफी इ. खाद्य पदार्थ उत्तमरित्या पुरविण्याचे व शासकीय खाजगी त्यांच्याकरीता अटी व शर्ती निविदा सूचना, विहित निविदा नमुना व महत्वाच्या सूचना यासंस्थेत उपलब्ध करण्यात आलेल्या असून त्यांच्या छापील प्रतींची किंमत रुपये १००/- अशी ठेवण्यात आली आहे.

आपल्या सिलबंद निविदा विहित नमुन्यात पंधरादिवसाच्या आत संस्थेत सादर कराव्यात, असे आवाहन प्र.प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल वि.द.टिकोले यांनी केले आहे.

हा करारपत्र ११ महिन्यांकरीता (Leave Licence) पध्दतीने करण्यात येईल. करारनामा (Legal Vetted) कायदेशीर असेल. जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होईल त्यादरानुसार आकरण्यात येईल. विज देयक/पाणी देयक स्वतंत्ररित्या आकारण्यात येईल.

## पनवेल पोलीस ठाण्यात ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा

**पनवेल :** येथील शहर पोलीस ठाण्यात शहर परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्यामध्ये जेष्ठ नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचनांप्रमाणे पोलीस ठाणे स्तरावर करण्यात येणार्या कार्यवाही बाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली तसेच



सायबर सुरक्षा, डिजिटल अरेस्ट यांबाबत मार्गदर्शन ज्येष्ठ नागरिकांच्या अनुषंगाने तरतुदींची देखील माहिती देण्यात आली.

यावेळी पोनि. शाकीर पटेल, पोनि. अभिजीत अभंग, सपोनि. राजेंद्र घेवडेकर,सपोनि. प्रज्ञा मुंडे यांचेसह १२५-१५० ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

## श्री ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४९वे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील श्री गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झालेल्या या संगीत संभेत पुणे येथील गायिका मोनिका काकडे-किंबहुने यांनी आपली संगीत सेवा सादर केली. त्यांनी पटदीप या



रागाने संगीत सभेची सुरुवात केली.त्यानंतर राग पुरिया धनश्रीविलंबित एकताल आणितीन ताल मधील बंदिश सादर केली. यानंतर नारायणा रमा रमणा आणि ऋतुराज आज वनी आला ही नाट्यगीते सादर केली. त्यानंतर राम का गुणगान करीए, कबिराचे विणतो शेले कौसल्येचा राम आणि एक राधा एक मीरा ही भक्तिगीते सादर केली. ''वही सच्चा गुरु कहलाये'' या भैरवीने त्यानी संगीत सभेची सांगता केली. त्याना कल्पतरू ठाकरे यांनी संवादिनी, अजित किंबहुने यांनी तबलासाथ केली, तर शार्दुल डोंगरे यांनी तालवाद्यसाथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे अप्रतिम सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. आयोजक व नामस्मरण केंद्रातील कार्यकर्ते यांनी मोलाचे योगदान दिले.

## संपादकीय

# वाहतूक कोंडीचा ताप

आपली अफाट लोकसंख्या आणि जो-तो स्वत:च्या वाहनातून प्रवासासाठी निघाल्याने पर्यटनस्थळीच नव्हे तर मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-नाशिक महामार्ग अशा सर्व महत्त्वाच्या रस्त्यांवर सध्या प्रचंड वाहतूक कोंडी झालेली दिसते आहे. उत्तम अवस्थेतील रस्त्यांवरही हे घडते. मग याबद्दल कुणाला जबाबदार धरायचे? सगळ्याच वाहनचालकांना कोंडीतून मार्ग काढताना संयम व जबाबदारीने वागण्याची सवय नसते. त्यामुळे कितीही रस्तेरुंदीकरण केले तरी वाढत्या वाहनसंख्येपुढे ते अपुरेच ठरते. या समस्येवर मोठ्या खुबीने व नियोजनाने तोडगा काढावा लागणार आहे.

**नाताळ आणि नववर्षाच्या सुट्यांमुळे मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, लोणावळा घाट आणि ताम्हिणी घाटात मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. शाळा-महाविद्यालयांची नाताळची सुटी सुरू होण्याच्या कितीतरी आधीपासून सगळ्यांचे सुटीत पर्यटनासाठी बाहेर पडण्याचे ठरत असते. परीक्षांचा कालावधी मागे पडल्याने व हिवाळ्यामुळे कुठल्याही पर्यटनस्थळी आल्हाददायक अनुभव येणार असल्यामुळे या सुटीत मंडळी प्रचंड संख्येने घराबाहेर पडतात. ही सुटी तशी छोटी असल्याने व थंड हवेमुळे 'रोड ट्रिप' मजेची होत असल्याने जवळपासच्या ठिकाणांना पसंती असते. कुटुंबियांसमवेत किंवा मित्रमंडळींसोबत विशेषत: मुंबई-पुण्याचे लोक मोठ्या संख्येने घराबाहेर पडतात. त्यामुळे लोणावळा घाट आणि ताम्हिणी घाटात वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसत आहेत. येथील परिस्थितीमुळे अखेर पोलिसांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस वे सोबतच जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरही वाहतुकीची कोंडी झाल्याने पर्यटकांचा मोठा हिरमोड होतो. दहा मिनिटांच्या प्रवासासाठी तास-तासभर लागल्याने पर्यटनाचे अवघे नियोजनच कोलमडून पडते. अनेकदा वाहतुकीची कोंडी होताच प्रत्येक जण निव्वळ आपली गाडी कशी पुढे जाईल याचा विचार करतो. वाहतूक पोलिस पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणेपर्यंत कुणीच एकमेकांशी सहकार्य करण्याकरिता पुढाकार घेत नसल्यामुळे सगळेच अडकून पडतात. अर्थात काहीवेळा प्रवाशांपैकीच काहीजण समजुतदारपणाने कोंडी सोडवण्याचा प्रयत्नही करतात. पण क्वचित यातून हमरीतुमरीही होते. सध्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर पोलिस प्रशासनाला वाहनचालकांना संयम बाळगण्याचे व नियमांचे पालन करण्याचे आवाहन करावे लागते आहे. अशा सुट्यांच्या काळात प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्या मार्गावरील वाहतूक स्थितीची माहिती घेऊन घराबाहेर पडावे किंवा त्यानुसार आपले पर्यटनाचे ठिकाण निवडावे. वास्तविक आज तंत्रज्ञानामुळे काही पवर ही माहिती सहज उपलब्ध होते. गर्दीच्या ठराविक वेळा टाळून प्रवास केल्यासही वाहतूक कोंडी टाळता येते. वाढती लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी वाहनांची संख्या यामुळे रस्त्यांचे कितीही रुंदीकरण केले व नव्या रस्त्यांची भर टाकून प्रवासाचा वेळ कमी केला तरी वाहतूक कोंडीच्या समस्येतून पर्यटकांची सुटका होताना दिसत नाही. देशभरातील बड्या नामांकित पर्यटन स्थळी व पर्यटनासाठीच ख्यात राज्यांमध्येही हे चित्र दिसते. नैनिताल, सिमला यांसारखी हिमालयाच्या कुशीत वसलेली पर्यटनस्थळेही आज वाहतूक कोंडीच्या समस्येला तोंड देत आहेत. या परिसरात रस्त्यांचे रुंदीकरण करणेही मोठे जिकिरीचे ठरते. डोंगर फोडून रस्ते रुंद करावेत तर तेथील निसर्गाची हानी होते. सध्या नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पुणेकर मोठ्या संख्येने कोकणात आणि गोव्याला निघाल्याने पुण्याहून रायगडच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यांवरही वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. स्थानिकांनाही या वाहतूक कोंडीचा फटका बसतो. या समस्येचे करायचे काय असा प्रश्न वाहतूक पोलिसांसह ठिकठिकाणच्या पर्यटन व्यावसायिकांना सतावतो आहे.**

# अलिबाग नगर परिषद निवडणुकीचे वास्तव...



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

अलिबाग नगर परिषदेत शेतकरी कामगार पक्षाने सत्ता राखली आहे. शेकापच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक निवडून आल्या. स्थानिक आमदार महेंद्र दळवी मुरूड आणि रोहा नगर परिषदेच्या निवडणुकीवर आपले लक्ष केंद्रित केले होते. त्यांचे अलिबाग नगर परिषद निवडणुकीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे शेकापला ही निवडणूक अधिक सोपी झाली. या निवडणुकीत विरोधकांचे तीन नगरसेवक निवडून आले आहेत. त्यात एक भाजपचा, तर दोन शिवसेना ठाकरे गटाचे आहेत. आमदार दळवी यांनी अलिबागमध्ये प्रचार केला असता, तर त्यांच्या पक्षाचे किमान दोन नगरसवेक निवडून आले असते.

अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी विधानसभा निवडणुकीत शेकापच्या चित्रलेखा पाटील यांचा मोठ्या फरकाने पराभव केला होता. शेकाप नेते आणि महेंद्र दळवी यांच्यात नेहमीच वाक्युद्ध सुरू असते. त्यामुळे अलिबाग नगरपालिकेच्या निवडणुकीत आमदार दळवी मोठ्या ताकदीने उतरतील असा सर्वांचा अंदाज होता, परंतु त्यांचे व्याही शेकाप नेते प्रशांत नाईक यांनी आपल्या मुलीलाच निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. प्रशांत नाईकांच्या खेळीमुळे राजकीय लढाईत नातेसंबंध आड आल्याने दळवी यांची मोठी गोची झाली. ते अलिबागच्या निवडणुकीपासून काहीसे अलिप्त राहिल्याने ही लढत शेकापसाठी सोपी झाली.

अलिबागचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी राखीव होते, परंतु प्रशांत नाईक यांनी आपल्या कन्या अक्षया नाईक हिला नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरवल्यामुळे निवडणूकीचे चित्रच बदलेले. महायुतीकडून इच्छूक असलेल्यांनी निवडणूक लढविण्यास नकार दिला. अलिबाग शहरातील शेकापचे सर्वमान्य नेतृत्व असलेले प्रशांत नाईक आणि शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांचे नातेसंबंध पाहता दळवी यांनी या निवडणुकीत फारसे स्वारस्य दाखवले नाही. आमदार दळवी यांनी या निवडणुकीतून अंग काढून घेतले. शिवसेना ठाकरे गटाच्या नाराज तनुजा पेरेकर भाजपच्या गळाला लागल्या. त्यांनाच नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली. अलिबागमध्ये नगराध्यक्षपदासह नगरसेवकपदाचे १५ उमेदवार देऊन भाजप यावेळी सर्व ताकदीनिशी निवडणुकीच्या रिंगणात उतरला होता. भाजपने मुस्लिम उमेदवारदेखील उभे केले होते, तर शिंदे गटाने पाच उमेदवार उभे केले होते.

या निवडणुकीत नगरसेवकपदाच्या २० पैकी १६ जागांवर शेकापचे उमेदवार निवडून आले, तर एका जागेवर काँग्रेस उमेदवाराचा विजय झाला. भाजपचे शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा यांनी विजय मिळवत नगरपालिकेत प्रवेश केला आहे. प्रभाग क्रमांक चारमधील लढतीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. या ठिकाणी तिरंगी लढत होती. ठाकरे गटाचे शहरप्रमुख संदीप पालकर आणि त्यांच्या पत्नी श्वेता यांनी या प्रभागातून निवडणूक लढवली. कुठलाच नेता प्रचाराला फिरकला नसताना शेकापच्या या बालेकिल्ल्यात हे दोन्ही उमेदवार विजयी झाले. शेकापला हा धक्का आहे.

यापूवी झालेल्या निवडणूकांमध्ये शेकापने सर्व जागा जिंकल्या होत्या. या वेळी मात्र त्यांना धक्का बसला आहे. विरोधकांचे तीन नगरसेवक जिंकून आले आहेत. स्वबळावर निवडणूक लढवणारे शिवसेना ठाकरे गटाचे संदीप पालकर आणि त्यांची पत्नी श्वेता संदीप पालकर हे दोघे प्रभाग क्रमांक ४मधून निवडून आले तसेच शिवसेना शिंदे गट-भाजप युतीचे ॲड. अंकित बंगेरा प्रभाग क्रमांक ७ ब मधून निवडून आले. त्यामुळे अलिबाग नगरपालिकेत आता विरोधकांचा प्रवेश केला आहे.

प्रभाग क्रमांक १ (अ)मध्ये शेकापचे संतोष गुरूव व शिवसेनेचे यश पालवणकर यांच्यातील लढत चुरशीची झाली. संतोष गुरुव अवघ्या २२ मतांनी विजयी झाले. गुरव यांना ५४६, तर पालवणकर यांना ५२४ मते मिळाली. प्रभाग क्र ९(ब) मध्ये शिवसेनेचे मनीष परेकर यांचा ३२ मतांनी पराभव झाला. शेकापचे सागर भगत यांना ८४०, तर शिवसेनेचे परेकर यांना ८०८ मते मिळाली. या दोन लढती चुरशीच्या झाल्या. येथे आमदार महेंद्र दळवी यांनी प्रचार केला असतात तर चित्र वेगळे असते. अलिबाग नगर परिषदेत विरोधेकांचे किमान पाच नगरसेवक निवडून आले असते.

अलिबागमध्ये काँग्रेस आघाडी विरूध्द शेकाप अशीच लढत व्हायची. त्या वेळी शेकाप सर्व जागा जिंकायचा. या वेळी शेकापने काँग्रेसशी आघाडी केली. तरीदेखील त्यांना तीन ठिकाणी पराभव पत्कारावा लागला आहे. हा शेकापलादेखील एक इशारा आहे. आमदार महेंद्र दळवी यांनी अलिबागमध्ये लक्ष न देता मुरूड आणि रोहा नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये लक्ष घातले. त्यामुळे आपल्या होम पीचवर त्यांच्या पक्षाचा एकही नगरसेवक निवडून येऊ शकला नाही हे वास्तव आहे.

# साहित्य वाचस्पती प्रभाकर माचवे



डॉ. प्रभाकर माचवे हे मान्यवर कवी आणि समीक्षक असून साहित्य वाचस्पती या उपाधीने ओळखले जात असत. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१७ रोजी ग्वाल्हेरमध्ये झाला. त्यांचे शिक्षण रतलाम व इंदूर येथे झाले. तत्त्वज्ञान आणि इंग्रजी साहित्य या दोन विषयांत आग्रा विद्यापीठाची एम.ए.ची पदवी त्यांनी संपादन केली. त्यांनी 'भारतीय भाषा परिषदे'चे संचालक म्हणून काम पाहिलं होतं. काव्य, समीक्षा आणि भाषांतर या क्षेत्रांत त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.

'हिंदी व मराठी के निर्गुण काव्य का तुलनात्मक अध्ययन' या विषयावर १९५८मध्ये त्यांना डॉक्टरेट मिळाली. १९३८ ते १९४८ या काळात उज्जैनला तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. त्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोग, साहित्य अकादमी, अमेरिका, श्रीलंका आणि जर्मनी येथील विद्यापीठे, भारतीय भाषा परिषद कलकत्ता इत्यादी अनेक संस्थांत त्यांनी प्रशासकीय व प्राध्यापक आदी विविध पदे भुषविली. माचवे यांनी विविध प्रकारचे ऐंशीपेक्षा जास्त ग्रंथ लिहिले असून त्यात कादंबरी, कविता, समीक्षा, एकांकिका, निबंध, चरित्र इत्यादी अनेक आकृतीबंधांचा समावेश आहे. त्यांत भाषांतरित ग्रंथांचाही समावेश आहे. त्यांच्या ग्रंथांचे अन्य भाषांमधून अनुवाद प्रसिद्ध झालेले आहेत.

त्यांना १९७२ सालचा सोविएट लँड नेहरू पुरस्कार मिळाला होता तसंच उत्तर प्रदेश शासनाचा राज्य पुरस्कारसुद्धा मिळाला होता. स्वप्न भंग, अनुक्षण, तेल की पकौडियां, 'विश्वकर्मा यांसारख्या काव्यसंग्रहांबरोबरच कबीर, राहुल संक्रीत्यायन, जगजीवनराम : व्यक्ती आणि विचार- अशी त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. प्रभाकर माचवे यांचे १७ जून १९९१ रोजी निधन झाले.

हिंदी, इंग्रजी, मराठी व इतर काही भारतीय भाषांवर त्यांचे प्रभुत्व असून या भाषांतील साहित्याचा त्यांचा तुलनात्मक व सखोल अभ्यासही आहे. त्यांनी हिंदीशिवाय इंग्रजी व मराठीतही काही ग्रंथ लिहिले आहेत. हिंदीत त्यांनी काव्य, कथा-कादंबरी, एकांकिका, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, समीक्षा, अनुवाद इ. प्रकारांत विपुल लेखन केले असून त्यांच्या ग्रंथांची एकूण संख्या ऐंशीवर भरते. 'अज्ञेय' यांनी संपादित केलेल्या तार सप्तक (१९४३) या प्रतिनिधिक काव्यसंग्रहात प्रमुख नवोदित कवी म्हणून माचवे यांच्या काही कविता संगृहीत आहेत. हिंदी काव्यातील नव्या प्रवाहांशी त्यांचा निकटचा संबंध असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहित्यिक चळवळी व घडामोडी यांविषयी ते जागरूक असतात. हिंदीतील 'प्रयोगवादी' व 'नई कविता' यांतील माचवे यांचे स्थान महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या अनेक ग्रंथांची भाषांतरे भारतीय व विदेशी भाषांत झाली आहेत. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल पेने लाँच केले पहिले क्रेडिट कार्ड, जाणून घ्या..

गुगलने अखेर त्यांचे पहिले जागतिक क्रेडिट कार्ड लाँच केले आहे आणि महत्त्वाचे म्हणजे ते भारतात पहिल्यांदा सादर केले जात आहे. गुगल पेने ॲक्सिस बँकेच्या सहकार्याने RuPay नेटवर्कवर हे को-ब्रँडेड कार्ड लाँच केले आहे. आजच्या डिजिटल युगात वेगाने वाढणाऱ्या यूपीआय पेमेंट सिस्टमला मान्यता देण्यासाठी कंपनीने या कार्डमध्ये यूपीआय लिंक करण्याची देखील सुविधा केली आहे. याचा अर्थ असा की ग्राहक हे कार्ड त्यांच्या यूपीआय खात्याशी लिंक करून दुकानं आणि व्यापाऱ्यांना सहजपणे पेमेंट करू शकतात.




या गुगल पे क्रेडिट कार्डचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे त्याचे इन्स्टंट कॅशबॅक आणि रिवॉर्ड्स. बहुतेक क्रेडिट कार्ड महिन्याच्या शेवटी कॅशबॅक देतात, परंतु गुगलने प्रत्येक व्यवहारावर इन्स्टंट रिवॉर्ड्स देऊन हा दृष्टिकोन बदलला आहे. याचा अर्थ तुम्ही तुमच्या पुढील खरेदीसाठी तुमचे रिवॉर्ड पॉइंट्स त्वरित रिडीम करू शकता.


तर या कार्ड लाँचवेळी गुगलचे वरिष्ठ संचालक शरथ बुलुसु यांनी सांगितले की, ग्राहकांना रिवॉर्ड्स रिडीम करण्यात जास्त त्रास होऊ नये म्हणून कंपनीने या फीचरवर विशेषतः काम केले आहे.

भारतात णझख आणि क्रेडिट कार्डच्या एकत्रित वापराची मागणी वेगाने वाढत आहे. फोनपे, एसबीआय कार्ड्स आणि एचडीएफसी सारख्या प्रमुख कंपन्यांनी आधीच त्यांचे स्वतः चे RuPay कार्ड लाँच केले आहेत. २०१९मध्ये पेटीएमने हे सर्वप्रथम लाँच केले होते. या बाजारात Cred आणि super.moneyदेखील सक्रिय आहेत.

आजच्या तीव्र स्पर्धेदरम्यान गुगलचा प्रवेश भारतीय वित्तीय बाजारपेठेत अधिक काळ टिकण्याची कंपनीची इच्छा दर्शविले आहे. मास्टरकार्ड आणि व्हिसा कार्ड सध्या UPIशी जोडले जाऊ शकत नाहीत या वस्तुस्थितीमुळेदेखील ही उत्सुकता वाढली आहे.

याव्यतिरिक्त हे गुगल पे कार्ड ग्राहकांना त्यांचे महिन्याचे बिल ईएमआयमध्ये रूपांतरित करण्याची परवानगी देते. ग्राहक सहा किंवा नऊ महिन्यांत सोप्या हप्त्यांमध्ये पैसे देऊ शकतात. एकूणच, भारतातील फक्त २०% लोकांना क्रेडिटची सुविधा उपलब्ध आहे. गुगल पेच्या या हालचालीमुळे देशाच्या विशाल बाजारपेठेत क्रेडिट कार्डचा प्रवेश वाढू शकतो.

# ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे



**निमित्त**

कुष्ठरोग्यांच्या सुश्रुषेसाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे बाबा आमटे यांचा आज जन्मदिन आहे. आधुनिक काळातील संत असेच त्यांचे वर्णन केले जाऊ शकते. महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे आनंदवन आश्रम सुरू करून आपल्या अपार कष्टाने, कठोर परीश्रमाने आणि प्रचंड इच्छाशक्तीने त्याचे नंदनवन केले, त्याला तीर्थस्थळाप्रमाणे पवित्र केले.

कुष्ठरोग्यांच्या सुश्रुषेसाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे बाबा आमटे यांची आज जयंती आहे. आधुनिक काळातील संत असेच त्यांचे वर्णन केले जाऊ शकते. महाराष्ट्रातील चंद्रपूर येथे आनंदवन आश्रम सुरू करून आपल्या अपार कष्टाने, कठोर परिश्रमाने आणि प्रचंड इच्छाशक्तीने त्याचे नंदनवन केले. त्याला तीर्थस्थळाप्रमाणे पवित्र केले.

बाबा आमटे यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे झाला. त्यांचे मूळ नाव मुरलीधर देविदास आमटे. त्यांचे कुटुंब त्या भागातील जमीनदार होते. खानदानी श्रीमंती घराण्यात चालत आलेली होती. त्यांचे बालपण ऐश्वर्यात गेले. बाबा आमटेंना लहानपणी चित्रपट फार आवडायचे.

बाबा लहानपणापासून स्वतंत्र विचारांचे होते. त्यांना एक सामाजिक जाण मनात होती. महाविद्यालयीतन दिवसांत बाबा आमटेंनी भारताची परिक्रमा केली. रवींद्रनाथ टागोरांच्या संगीत आणि कवितांनी ते अत्यंत प्रभावित झाले. टागोरांसह साने गुरुजींचाही त्यांच्यावर बराच प्रभाव होता. बाबा आमटेंनी वकिलीचे शिक्षण पूर्ण केल्यावर काही काळ वकिलीही केली.

एकदा फेरफटका मारत असताना त्यांनी एक कुष्ठरोगी पाहिला. हातपाय झटलेले, भर पावसात भिजत असलेला माणूस पाहून बाबा भयभीत झाले. त्या माणसाची बाबा आमटेंनी सेवा, सुश्रुषा केली. मात्र, तो फार काळ जगला नाही. हेच आपल्या जीवनाचे ध्येय असल्याचे बाबांना समजले. आपले उर्वरित आयुष्य कुष्ठरोग्यांसाठी द्यायचे, हाच ध्यास त्यांनी धरला.

तत्कालीन समाजात कुष्ठरोग म्हणजे मागील जन्मीच्या पापांचे फळ समजले जात असे. कुष्ठरोग्यांना वाळीत टाकले जात असे. १९५२मध्ये वरोऱ्याजवळ बाबा आमटेंनी आनंदवनाची स्थापना केली. आव्हानात्मक वृत्तीमुळे कुष्ठरोगासारख्या महाभयंकर रोगाने ग्रस्त झालेल्यांची सेवा करण्याचे अतिकठीण व्रत त्यांनी स्वीकारले. कुष्ठरोग्याची केवळ सुश्रुषा करायची नाही, तर त्याला आत्मनिर्भर करण्याचा दृढ निश्चय त्यांनी केला. महारोगी सेवा समिती या संस्थेच्या माध्यमातून बाबांनी कार्याचा विस्तार केला.

केवळ कुष्ठरोग्यांसाठीच नव्हे, तर अंधांसाठी, मूकबधिरांसाठी विशेष शाळा निर्माण केल्या. कुष्ठरोग्यांसाठी उपचार, प्रशिक्षण व पुनर्वसन याकरिता त्यांनी रुग्णालयाची व अन्य प्रकल्पांची स्थापना केली. कुष्ठरोग्यांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी महाविद्यालयाची स्थापना केली. प्रौढ व अपंगांसाठी हातमाग, सुतारकाम, लोहारकाम यांसारखे व्यवसाय प्रशिक्षण केले; त्यांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवला. बाबा आमटे यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. ९ फेब्रुवारी २००८ रोजी बाबा आमटे यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या, थंडीत कोणत पाणी प्यावं?



डॉक्टर नेहमी प्रत्येकाला सकाळी उठल्यानंतर चालण्याचा सल्ला देतात. दररोज सकाळी चालल्यामुळे आपलं अनेक गंभीर आजारांपासून संरक्षण होतं. चालल्यामुळे रक्ताभिसरण सुधारते, शुगर नियंत्रणात राहते, शरीरातील चरबी कमी होते. त्यामुळे चालणं हे आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरतं, पण चालल्यानंतर गरम पाणी प्यावं की थंड पाणी प्यावं असा प्रश्न बहुतेक लोकांना पडतो.

आपण सकाळी चालून आल्यानंतर आपल्या शरीरातील बीपी वाढतो. त्यामुळे प्रत्येकाने चालल्यानंतर थंड पाणी पिणं फायदेशीर ठरतं, पण थंडीच्या दिवसांमध्ये चालल्यानंतर थंड पाणी पिल्यामुळे आपल्या शरीरातील तापमानात अचानक बदल होतो. त्यामुळे आपल्याला ताप, सर्दी, खोकला अशा अनेक आजारांचा सामना करावा लागतो. तसंच थंड पाणी पिल्यामुळे आपल्या हृदयाच्या कार्यावरही दबाव येऊ शकतो. त्यामुळे अशा परिस्थितीत कोमट पाणी पिणे गरजेचे आहे. हिवाळ्यात कोमट पाणी पिल्यामुळे आपलं अनेक आजारांपासून संरक्षण होतं आणि ते शरीरासाठी फायदेशीर ठरतं.

सकाळी चालल्यानंतर कोमट पाणी पिल्यामुळे रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते. कोमट पाणी हे आपल्या हृदयासाठी फायदेशीर आहे. हे पाणी हृदयाचे कार्य सुधारण्यास मदत करते, तर कोमट पाणी हे आपल्या रक्तात मिसळते त्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते. तसंच आपला रक्तदाब संतुलित करण्यास मदत करते.

कोमट पाणी हे आपल्या पोटासाठीदेखील फायदेशीर आहे. सकाळी चालल्यानंतर प्रत्येकानं दररोज कोमट पाणी पिणं गरजेचं आहे. कोमट पाणी पिल्यामुळे आपली पचनक्रिया सुधारते, पचनाशी संबंधित सर्व समस्या कमी करते तसंच कोमट पाणी प्यायल्यामुळे पोटदुखी, उलट्या, जुलाब या समस्यांपासूनदेखील आपला बचाव होते, तर हे पाणी प्यायल्यामुळे आपल्या शरीरातील चरबी देखील कमी करण्यास मदत होते.

# माणगावमध्ये डम्पिंगच्या आगीमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना त्रास

**माणगाव : बातमीदार**



माणगाव नगरपालिकेच्या डम्पिंग ग्राउंडलगत असलेली वनवासी कल्याण आश्रम शाळा सध्या आरोग्याच्या गंभीर संकटाला सामोरी जात आहे. या शाळेत शिक्षण घेणाऱ्या ३९७ विद्यार्थ्यांपैकी ५० हून अधिक विद्यार्थ्यांना न्युमोनिया, दमा, खोकला, सर्दी तसेच श्वसनासंबंधीच्या त्रासाने घेरले असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

येथील स्थानिक नागरिकांसह संपूर्ण शहराचे आरोग्य धोक्याचे उंबरठ्यावर उभे आहे.

संबंधित शासनाकडून वेळीच लक्ष दिले गेले नाही तर हवेतील प्रदूषणामुळे सार्वजनिक आरोग्यच धोक्यात आले आहे.

शासनाच्या नियमानुसार शाळा,वसाहती आणि वसतिगृहांच्या आसपास डम्पिंग ग्राउंड उभारण्यास मनाई असताना, माणगाव नगरपंचायतीने येथे मोठ्या प्रमाणावर कचरा साठवून ठेवला आहे. या कचऱ्याची नियमित आणि शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट न लावल्यामुळे वारंवार आग लागते, प्लास्टिक जळाल्याने त्यातून निघणारा दाट काळा धूर थेट शाळा परिसरात पसरतो. धुराच्या सततच्या संपर्कामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या आश्रम शाळेत शिकणाऱ्या ३९७ शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे अशा प्रकारे शासनाचे दुर्लक्ष असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

याबाबत माणगांव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे काम सुरू असून येत्या १५ ते २० दिवसांत डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल.



**चौक : आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकासनिधीतून चौक ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील ब्ल्यू व्हेल सोसायटीला जोडणाऱ्या रस्त्याचे उद्घाटन सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, शहर उपाध्यक्ष सागर ओसवाल, प्रमोद देशमुख, प्रवीण पाटील, माजी उपसरपंच सुभाष पवार उपस्थित होते.**


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कलावती हिराचंद भोईर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सागपालेखार (५५३३४०)**
(PU-ID : 20501962276), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १/४३ **खाते क्र.१६७** | २ | ०.०८.०० पो.ख. ०.००.८० | ०.९८ |
| | | **एकुण ०.०८.८०** | |
| **एकूण क्षेत्र ०.०८.८० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कलावती हिराचंद भोईर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सागपालेखार (५५३३४०)**
(PU-ID : 29804273726), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १/५४ **खाते क्र.१६७** | २ | ०.०५.३० पो.ख. ०.००.५० | ०.६४ |
| | | **एकुण ०.०५.८०** | |
| **एकूण क्षेत्र ०.०५.८० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कलावती हिराचंद भोईर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सागपालेखार (५५३३४०)**
(PU-ID : 27238946668), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १/२३६ **खाते क्र.१६७** | २ | ०.१७.९० पो.ख. ०.०१.८० | २.१९ |
| | | **एकुण ०.१९.७०** | |
| **एकूण क्षेत्र ०.१९.७० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे. हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन असणा–या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड**

| कब्जेदार सदरी नाव | सर्व्हे नं./गट.नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आ.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|
| नरेश गणा मोर्बेकर उज्वला नरेश मोर्बेकर | ४४ | ५ | ०–४१–२० पो.ख.०–०३–८० एकुण. ०–४५–०० पैकी ०–१८–०० एवढ्या क्षेत्राकरीता जाहीरत | ८.९४ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु.साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक :– २६/१२/२०२५**

**सही/–**
**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
**शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स, जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८३३३०६३६१**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे–भिंगार, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३६ | ० | ०–३१–२० पो.ख. ०–०४–५० एकूण ०–३५–७० | २.६२ | श्रीमती. निर्मल परशुराम वरे, श्री. अशोक परशुराम वरे, सौ. उषा जगन्नाथ टावरे, श्री. शरद परशुराम वरे, श्री. रविंद्र परशुराम वरे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**(दि. २३.१२.२०२५ च्या अंकामध्ये सदर नोटीसमध्ये भिंगार ऐवजी लोणिवली म्हणुन नाव टाकले होते ते भिंगार असे वाचण्यात यावे.)**

**पनवेल.**
**दिनांक :– २६/१२/२०२५**

**सही/–**
**ॲड. एस. के. राणे**

पत्ता : ऑफीस नं. १२३, पहिला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड, मो.नं. ९८१९८६९२१२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत योग्य त्या मोबदल्यात खरेदी करण्याचे ठरविले आहे .

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकारणी (रू.पै) | भोगवटादार वर्ग |
|---|---|---|---|
| १६२/१ | ००.२४.५० पो.ख : ००.०२.५० एकुण : ००.२७.०० | ४.५० | १ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात १) श्री राम जनार्दन हरड २) श्री. लक्ष्मण जनार्दन हरड यांच्या नावाची नोंद आहे, त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलांना कायमस्वरूपी विकण्याचे / हस्तांतर करण्याचे ठरविले असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत, दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घ मुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसांपर्यत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेल्या शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड. स्वप्नील रावसाहेब साळुंखे**
**पत्ता : शॉप नं. ०३, आशा हार्मोणी सीएचएस, प्लॉट नं. १४, सेक्टर १७, खांदा कॉलनी, पनवेल –४१०२०६, मो. नं ९८६००५०१४८**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कलावती हिराचंद भोईर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सागपालेखार (५५३३४०)**
(PU-ID : 23488906812), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १/१९६ **खाते क्र.१६७** | २ | ०.०८.०० पो.ख. ०.००.८० | ०.९८ |
| | | **एकुण ०.०८.८०** | |
| **एकूण क्षेत्र ०.०८.८० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **कलावती हिराचंद भोईर व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सागपालेखार (५५३३४०)**
(PU-ID : 13031036386), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १/१५५ **खाते क्र.१६७** | २ | ०.१०.४० पो.ख. ०.०१.०० | १.२५ |
| | | **एकुण ०.११.४०** | |
| **एकूण क्षेत्र ०.११.४० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
### ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**डिसेंबर २०२५**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | कॉनसेसो वर्गीस / जास्मिन वर्गीस | नहुष सदानंद कुंटे / अस्मिता नहुष कुंटे | पवल१–९३७०–२०२४ | २६/१२/२०२४ | सदनिका क्र.१०१, पहिला मजला, ए विंग, निंबेश्वर संस्कृती को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| २ | रेखा संदीप पाण्डेय / संदीप पाण्डेय | चंद्रकांत वसंतराव सोनावणे | पवल१–७४१७–२०२५ | २३/०९/२०२५ | सदनिका क्र.डी १०२, पहिला मजला, बि.नं.०२, साक्षी पार्क २ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३ | दिग्विजय विलास भोपी/ धनंजय विलास भोपी | मुनिर अबुलिस अन्सारी/ रुकसाना मुनिर अन्सारी | पवल४–११६९१–२०२४ | २८/०६/२०२४ | सदनिका क्र. आय ३००२, तिसावा मजला, आय विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| | मुनिर अबुलिस अन्सारी/ रुकसाना मुनिर अन्सारी | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रोप्रा. विनय श्रवणकुमार अग्रवाल यांच्या तर्फे संदीप रमेश केणी | पवल२–१९१७४–२०२३ | ३१/१०/२०२३ | |
| ४ | जीवन वाल्मिक चव्हाण / धनश्री जीवन चव्हाण | संदेश बाबासाहेब सनगर / सुषमा संदेश सनगर | पवल५–२२४१२–२०२५ | ०९/११/२०२५ | सदनिका क्र.ए १०३, पहिला मजला, गंगोत्री सागर को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| | संदेश बाबासाहेब सनगर/ सुषमा संदेश सनगर | नरहरी अनंत परब | पवल४–१०९१९–२०१५ | ३१/०८/२०१५ | |
| ५ | विद्याधर विलास बनसोडे / स्वाती विद्याधर बनसोडे | सतिश महादेव फाळके | पवल२–१४८६८–२०२१ | २६/१०/२०२१ | सदनिका क्र.०२, तळ मजला, बि.नं. सी ५, तपोवन को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| | सतिश महादेव फाळके | राकेश बी. अग्रवाल | उरण –०१६३५–२००८ | २५/२/२००८ | |
| ६ | अक्षय अनंत गुरव /अक्षिता अक्षय गुरव | मे. युनिटी बिल्डर्स ॲण्ड डेव्लपर्स तर्फे प्रषित ॲलन चांदेकर | पवल२–७८४४–२०२३ | १२/०५/२०२३ | सदनिका नं.४०५, चौथा मजला, बी विंग, श्री युनिटी कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ७ | जॉन इसाक | जॉन इसाक / सारामा इसाक | पवल२–२९७०–२०२४ | १३/०२/२०२४ | सदनिका क्र.४०३, चोथा मजला, ए विंग, आश्रय कॉर्नर, मौजे पालीदेवद |
| ८ | जॉन ऐसक | जॉन ऐसक / सारामा इसाक | पवल३–४५६९–२०२२ | १६/०३/२०२२ | सदनिका क्र.४०४, चौथा मजला, ए विंग, आश्रय कॉर्नर, मौजे पालीदेवद |
| ९ | कश्मिरा राजेश परदेशी तर्फे अखत्यारी म्हणून राजेश रमेश परदेशी | ज्योती जनार्दन मानकवळे/ जनार्दन नारायण मानकवळे | पवल२–७६८३–२०२४ | १६/०४/२०२४ | सदनिका क्र.३, तळ मजला, श्रध्दा संकुल को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १० | रुपेश भाई कोचरेकर | सुहास राजाराम कांबळी | पवल१–३०६५–२०२५ | १७/०४/२०२५ | सदनिका क्र.बी १०४, पहिला मजला, साक्षी पार्क टाईप ४ को हो सो. मौजे पालीदेवद |
| ११ | विजय प्रकाश खाडे / सुषमा विजय खाडे | सुरेंद्र कुमार सन ऑफ फूल सिंघ | पवल२–१२८९५–२०२५ | १८/०६/२०२५ | सदनिका क्र.०९, पहिला मजला, बि.नं. सी ५, तपोवन को.हो.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १२ | लालचंद हरिनाम मल्लाह / मीना लालचंद मल्लाह | प्रशांत गजानन नाईक | पवल२–१७१७१–२०२५ | १४/०८/२०२५ | सदनिका क्र.३०२, तिसरा मजला, ए विंग, पुष्पश्री को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| | प्रशांत गजानन नाईक | हेमंत गजानन नाईक / गजानन रामभाऊ नाईक | पवल३–१०८०६–२०२२ | २२/०६/२०२२ | |
| १३ | आशकुमार ब्रम्हा सिंह / दिपीका सिंह | प्रजापती रमेश कोदर | पवल१–८९८२–२०२५ | १८/११/२०२५ | सदनिका क्र.बी १०३, पहिला मजला, बि.नं.१, साक्षी पार्क २ को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १४ | प्रज्ञेश विजय भोसले / कुसूम प्रज्ञेश भोसले | श्रृती राजेश मयेकर / राजेश शरद मयेकर | पवल४–२१३७४–२०२५ | २४/११/२०२५ | सदनिका क्र.सी २०४, दुसरा मजला, सी विंग, गंगा दर्शन को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| १५ | गोविंद मोतीलाल जैसवाल / सुमित्रा मोतीलाल जैसवाल | जय प्रकाश नारायण | पवल१–९४८९–२०२५ | ०१/१२/२०२५ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, बी विंग, निंबेश्वर संस्कृती को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| १६ | अजित हरी पावसकर / शेजल अजित पावसकर | माधवी अशोक होतचंदानी / जवाहर के. जगयासी | पवल४–२३१२–२०१५ | २४/०२/२०१५ | रो हाऊस नं. ०४, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे शिलोत्तर रायचूर |
| | माधवी अशोक होतचंदानी / जवाहर के. जगयासी | मे. सनबीम असोसिएटस तर्फे एल.आर. वेंकटरमण तर्फे कु.मु. अशोक आर. गुप्ता | पवल४–२३०९–२०१५ | २४/०२/२०१५ | |
| १७ | राहूल दुंदा केणी | दुंदा बबन केणी | नोटरी रजि. नं. २००२७ | ०५/११/२०२५ | घर मिळकत क्र. २६८/१ मोजे पालीदेवद |
| १८ | महेश ढुंदा केणी | कांता दुंदा केणी | नोटरी रजि. नं. २००२७ | ०५/११/२०२५ | घर मिळकत क्र. ११४/३ मौजे पालीदेवद |
| १९ | सिमा सतिश कामले | सतिश नंदकुमार कामले | नोटरी रजि. नं. १५०६१ | १३/११/२०२५ | सदनिका क्र.५, पहिला मजला, भवानी दर्शन को.हौ.सो, मौजे पालीदेवद |
| २० | शोभा विष्णू पोपेटा | विष्णू हडक्या पोपेटा | नोटरी रजि. नं.१२५६ | १८/११/२०२५ | घर मिळकत क्र. ४६८, मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. ज्योती रविंद्र केणी )**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# वायू प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेची नियमावली जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संबधित विभागांची बैठक घेऊन अधिकारी, कर्मचारी यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर उतरुन अधिक प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते व त्या अनुषंगाने कार्यवाहीला सुरुवातही करण्यात आलेली आहे.



यामध्ये एक महत्वाचा घटक बांधकाम व्यावसायिकांचा असून बांधकाम साईट्स वरील प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांची मानक कार्यप्रणाली महानगरपालिकेने जाहीर केलेली आहे. त्याचे काटेकोर पालन सर्व विकासकांकडून करण्यात यावे या करिता महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. या प्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ७० हून अधिक विकासक व वास्तुविशारद उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी बांधकाम व पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. सदर कामांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण व ब्लास्टिंग यांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेली जनहित याचिकेत पारित केलेल्या आदेशानुसार वायू प्रदूषण कमी करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर समितीने नवी मुंबई पालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम सुरु असलेल्या एकूण ८५ बांधकाम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांची, तुर्भे येथील आरएमसी प्लान्टची व पालिकेच्या रस्त्यांच्या कामांची दि.१३ डिसेंबर २०२५ रोजी स्थळ पाहणी केली असून नवी मुंबई महानगरपालिकेच्या मानक कार्यप्रणाली मधील उपाययोजनांची सर्व बांधकाम साईटवर प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

१. बांधकाम साईटवर सीसीटिव्ही कॅमेरे तसेच हवेची गुणवत्ता मोजमाप दर्शविणारे डिस्प्ले बसविण्याबाबत बांधकाम परवानगीमध्ये अट नमूद करण्यात येईल.

२. सदर वायू गुणवत्ता मापन यंत्रणा केंद्रीकृत डॅशबोर्डशी एकत्रित करून प्रत्यक्ष वेळेत माहिती संकलन, अहवाल निर्मिती व वायू गुणवत्ता निर्देशांक मर्यादा ओलांडल्यास स्वयंचलित इशारा प्रणाली कार्यान्वित करण्यात यावी. या डॅशबोर्डद्वारे नवी मुंबई महानगरपालिका व एमपीसीबी यांना दैनंदिन माहिती उपलब्ध होईल तसेच धूळ निर्माण होणाऱ्या ठिकाणी एक्यूआय सेन्सर योग्य ठिकाणी बसविण्यात यावेत.

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विद्यमान वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्रे व्यतिरिक्त, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील प्रत्येक २ चौ. कि.मी. क्षेत्रासाठी १ या प्रमाणात एकूण ५५ वायू गुणवत्ता निरीक्षण केंद्रे बसविण्याची प्रक्रिया नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येईल.

४. नवी मुंबई महानगरपालिकेने वायू प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत साप्ताहिक माहिती नोंदविण्यासाठी गुगल स्प्रेडशीट स्वरूपातील तपासणी यादी विकसित करून त्याची लिंक सर्व विभागीय अधिकारी यांना वितरीत केली आहे. संबंधित विभागांनी सदर तपासणी यादीप्रमाणे कारवाईची माहिती नियमितपणे अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

५. बांधकाम परवानगी देताना, संबंधित प्रकल्पातील कामगार / मजुरांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी सविस्तर मानक कार्यप्रणाली परवानगीच्या अटींमध्ये समाविष्ट करण्यात येईल व त्याचे पालन करणे पुढील प्रमाणपत्रांसाठी पूर्वअट राहील. नियमावलीचे उल्लंघन आढळल्यास बांधकाम कामे थांबविणे तसेच बांधकाम परवानगी रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

६. खोदकाम / रस्त्याचे खोदकाम करणे / उत्खनन कामांसाठी परवानगी देताना धूळ नियंत्रण व सुरक्षिततेसाठी धातू किंवा प्लास्टिकचे कडक बॅरिकेड्स उभारणे तसेच निर्माण झालेला मलबा दररोज हटविणे



# रिसर्च आविष्कार कन्वेंशनच्या अंतिम फेरीत रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठांतर्गत दिनांक १९ डिसेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता घेण्यात आलेल्या आविष्कार संशोधन कन्वेंशनच्या अंतिम (पोडियम) फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन परंपरेला नवी उंची प्राप्त झाली आहे. वर्ग दोनची अंतिम फेरी मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी भवन येथे पार पडली व स्मार्ट पोल्ट्री लिंक या प्रकल्पाचे मार्गदर्शक प्रा. विशाल देशमुख यांनी काम पाहिले होते. हा प्रकल्प जिया भोईर व साक्षी पाटील (द्वितीय वर्ष विज्ञान), हनिफा शहा (द्वितीय वर्ष माहिती तंत्रज्ञान) आणि खल्फे अयमान (द्वितीय वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्यांनी सादर केला. वर्ग तीनची अंतिम फेरी दिनांक २० डिसेंबर रोजी विद्यार्थी भवन, मुंबई विद्यापीठ येथे आयोजित करण्यात आली होती. ॲसिड इलेक्ट्रो मशिनिंग या प्रकल्पाचे मार्गदर्शक डॉ. दीपिका हसिजा यांनी काम पाहिले होते. शिवम सिंग व सत्यम सिंग (द्वितीय वर्ष विज्ञान) या विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प सादर केला. त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना व सर्जनशील सादरीकरणाचे विशेष कौतुक करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री.वाय. टी. देशमुख, संस्थेचे अध्यक्ष श्री. अरुण शेठ भगत, श्री. प्रशांत ठाकूर,( आमदार पनवेल विधानसभा) श्री. परेशशेठ ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले व भविष्यातही संशोधन क्षेत्रात अशीच भरारी घेण्यासाठी शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

# एलिफंटा बेटावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी खबरदारी घेण्याचे आवाहन



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील एलिफंटा बेटावर ख्रिसमस, सरत्या वर्षाला निरोप, नवीन वर्षाचे स्वागत आणि लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या देशी विदेशी हजारो पर्यटकांच्या सुरक्षेतेसाठी सर्वच शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवाणी यांनी केले आहे.

जगप्रसिद्ध एलिफंटा बेटावर दरवर्षी ख्रिसमस,सरत्या वर्षाला निरोप, नवीन वर्षाचे स्वागत आणि लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या देशी विदेशी हजारो पर्यटक येतात. ख्रिसमसपासुन नुतनवर्षाच्या सुरवातीपर्यत बेटावर येणाऱ्या हजारोंच्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांमुळे गर्दी होते.

पर्यटकांच्या गर्दीमुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. यामुळे पर्यटकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.पर्यटकांची सुरक्षिततेसाठी खबरदारीची उपाययोजना करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि.२३) एलिफंटा बेटावर शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलाविण्यात आली होती.

मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राहुल काटवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीसाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच, महाराष्ट्र सागरी मंडळ एलिफंटा जेट्टीचे बंदर निरीक्षक विनायक करंजे, गेटवे जलवाहतूक संस्थेचे नासिर मारणे, एलिफंटा लोकल गाईडचे प्रतिनिधी, दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचे प्रतिनिधी, एलिफंटा लेणी येथील कार्यालयाचे सिक्युरिटी, स्थानिक नागरिक तथा कर्मचारी आदी उपस्थित होते.

ख्रिसमस, वर्षाअखेरीसव नवीन वर्षाच्या निमित्ताने सुट्ट्यांमध्ये बेटावर येणाऱ्या पर्यटकांची मोठी गर्दी होत असते. पर्यटकांना मनसोक्त पर्यटनाचा आनंद घेता यावा तसेच बेटावर येणाऱ्या देशी-विदेशी हजारो पर्यटकांच्या सुरक्षेतेसाठी सर्वच शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी खबरदारी घेण्याचे आवाहन मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल काटवानी यांनी केले.

# निवडणूक काळात आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी विविध पथकांना प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आज विविध पथकांना त्यांच्या जबाबदाऱ्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये व्हिडिओ व्ह्यूइंग पथक (VVT), स्टॅटिक सर्व्हेलन्स पथक (SST), व्हिडिओ सर्व्हेलन्स पथक (VST) तसेच भरारी पथक (Flying Squad) यांना प्रशिक्षण आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अतिरिक्त आयुक्त महेश मेघमाळे व उपायुक्त रवीकिरण घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले. तसेच इव्हीएम हाताळणी प्रशिक्षण महापालिकेच्या व्यापारी संकुल येथे परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले.



**भरारी पथक**

यामध्ये भरारी पथक (Flying Squad) हे तक्रारींवर तात्काळ कारवाई करणे, आचारसंहिता उल्लंघनाची तपासणी करणे तसेच पोलीस व निवडणूक निर्णय अधिकारी (RO) यांच्या कार्यालयाशी समन्वय साधण्याची महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. रोख रक्कम, दारू, भेटवस्तू आदींची तपासणी व जप्ती, तसेच व्हिडिओ/फोटोद्वारे पुरावे गोळा करणे या प्रमुख कामाबाबत या प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

**व्हिडिओ व्ह्यूइंग पथकाने**

व्हिडिओ व्ह्यूइंग पथकाने सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक प्रचारावर लक्ष ठेवून उल्लंघनाचे व्हिडिओ पुरावे संकलित करणार असून वेळोवेळी निवडणूक निर्णय अधिकारी (RO) कडे अहवाल सादर करण्याबाबत सूचना यावेळी देण्यात आल्या. याबरोबरच चित्रीकरण केलेल्या व्हिडीओचे परीक्षण, उल्लंघन ओळखून अहवाल करणे व खर्च नोंदणीसाठी आवश्यक माहिती देण्याचे कामही या पथकाकडून करण्यात येणार आहे.

**स्टॅटिक सर्व्हेलन्स पथक**

स्टॅटिक सर्व्हेलन्स पथकाने तपास नाके व संवेदनशील ठिकाणी वाहन तपासणी करून रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंची तपासणी करणार आहे. पंचनामे, अहवाल तयार करणे व व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे ही जबाबदारी या पथकावर असेल.

**व्हिडिओ सर्व्हेलन्स पथक**

व्हिडिओ सर्व्हेलन्स पथकाने सभा, मिरवणुका व प्रचार कार्यक्रमांचे चित्रीकरण करून खर्च निरीक्षणासाठी आवश्यक पुरावे उपलब्ध करून देणार आहे. आचारसंहिता उल्लंघनाची नोंद घेणे हेही या पथकाचे प्रमुख कार्य आहे. याबाबत या प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

**इव्हीएम हाताळणी प्रशिक्षण**

क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालातील कर्मचारी, ईव्हीएम हाताळणी करणारे कर्मचारी यांना इव्हीएम हाताळणी प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये इव्हिएम मशीन मधीन कंट्रोल यूनिट, कॅनसेट, इव्हिएम संचाची चेकिंग, रिअल टाईम क्लॉक सेटिंग याबाबती माहिती देण्यात आली.

# स्वामी नारायण मंदिरात संत पारायण

**उरण : वार्ताहर**

उरण येथील बिएपीएस स्वामी नारायण संस्कार केंद्र उरण, मोरा येथे २१,२२ व २३ रात्री ८ ते १० वाजेपर्यंत या तीन दन दिवस संत पारायणाचे आयोजन करण्यात आले होत .



स्वामी नारायण मंदिर दादर (मुंबई) येथून संत अक्षर कीर्तन स्वामी यांनी तीन दिवस विविध विषयांनावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोरा उरण, बोकडवीरा येथून सुमारे ३५० सत्संगी व हरीभक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

अक्षर कीर्तन स्वामी यांनी मी पणामुळे होणारे नुकसान, स्वामी नारायण वचनामृत पठण, मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम, आचरण कसे करावे, देवाची भक्ती कशी करावी, पूजा, आपले आचरण कसे असावे, लहान वयातील संस्कार कसे करावे, अश्या विविध विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मोरा, उरण, बोकडवीरा येथून सुमारे ३५० सत्संगी, हरीभक्त उपस्थित होते.

या वेळी मंदिराचे कॉरडीनेटर राजेश पटेल, कीर्तन पटेल, कनुभाई पटेल, हरिचंद्र कोळी, शशिकांत कोळी, मंदिराचे पुजारी अविनाश कोळी,परबत मेर सिद्धू कोळी, राजेश कोळी, गणेश कोळी, महादेव ढोले, रवी कोळी, नितीन कोळी आदींनी मेहनत घेतली.

स्वामी नारायण मंदिरात गोकुळ अष्टमी, संत पारायण, दिवाळीत अन्नकोट, मंदिर वर्धापन दिन, श्रावणात पारायण, धनुर मास पारायण आदि कार्यक्रम साजरे केले जातात तर प्रत्येक मंगळवारी रात्रो ९ ते १० सत्संग सभा आयोजित केली जाते. या सत्संग सभेस स्वामी नारायण मंदिर दादर (मुंबई) येथून संत येउन प्रवचन देत असतात, अशी माहिती मंदिराचे पुजारी अविनाश कोळी यांनी दिली.

# पर्यावरण सुरक्षा विषयावर जनजागृती




**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ कला व वाणिज्य महाविद्यालय , उरणच्या एनएसएस विभागाच्या श्रमसंस्कार शिबिर अंतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन येथे फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरण,रायगड( महाराष्ट्र ) तर्फे पर्यावरण रक्षा-मानव सुरक्षा या विषयावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व सदस्य राकेश सुरेश शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पर्यावरण व मानव-वन्यजीव संघर्ष तसेच सर्प ओळख,सर्पदंश कसे टाळावे व सर्पदंश झाल्यास काय करावे? संस्थेच्या शून्य सर्पदंश मृत्यू अभियान आणि स्नेक बाईट ऍक्शन टीम प्रकल्पाबद्दल जनजागृती केली. तसेच संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या मानव -बिबट संघर्ष ,बिबटयाचे हल्ले वाढत आहेत त्याची कारणे व त्यावरील उपाययोजना याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दत्ता हिंगमिरे यांचीही या वेळी उपस्थिती लाभली होती.

# इंदूर मनपाच्या अभ्यासगटाकडून नवी मुंबईतील प्रकल्पांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत काही वर्षांपासून देशात सातत्याने पहिल्या तीन क्रमांकामध्ये अग्रभागी असणाऱ्या चार शहरांची 'सुपर स्वच्छ लीग' ही एक विशेष कॅटेगरी निर्माण करण्यात आलेली असून त्यामध्ये नवी मुंबईसह मानांकित असणाऱ्या इंदूर महानगरपालिकेतील अभ्यासगटाने नुकतीच नवी मुंबई महानगरपालिकेस भेट देऊन विविध प्रकल्पांची पाहणी केली व नवी मुंबईत आधुनिक तंत्रप्रणालीचा अंगिकार करून केल्या जात असलेल्या नाविन्यपूर्ण कामांची प्रशंसा केली.



या दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यात त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय वास्तूच्या रचनेचे व तेथील अत्याधुनिक सुविधांचे आणि प्राधान्याने येथील स्वच्छतेचे कौतुक केले. दैनंदिन कचरा संकलन आणि वाहतुक प्रणालीचे नियमित निरीक्षण आणि त्यावर नियंत्रण करणाऱ्या मुख्यालयात पहिल्या मजल्यावर स्थापित इंटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सेंटरला भेट देऊन त्यांनी संपूर्ण प्रणाली जाणून घेतली. कोणते वाहन कुठे आहे, त्याने कोणत्या वेळी कुठल्या कचरापेटीतील कचरा संकलित केला यावर कचऱ्याच्या डब्यावरील मायक्रोचीपव्दारे तसेच वाहनावरील जीपीएस प्रणालीव्दारे नियंत्रण ठेवले जात असल्याची कार्यप्रणाली उत्तम असल्याचे अभिप्राय त्यांनी दिले.

केंद्रीय वस्त्र मंत्रालय संचलित वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या वस्त्र कचरा पुनर्प्रक्रिया केंद्राची पाहणी करताना ते प्रभावित झाले. वस्त्र कचरा संकलित करून तो आकर्षक साहित्याच्या रूपाने पुनर्वापरात आणणाऱ्या प्रकल्पाच्या वेगळेपणाचे त्यांनी कौतुक केले.

नेरूळ येथील वंडर्स पार्कमध्ये असलेल्या जगातील आठ आश्चर्यांच्या प्रतिकृतींमधून माहिती मिळते व मनोरंजनाच्या साधनांमधून संपूर्ण कुटुंबासाठी एकत्र वेळ घालविण्याचे एक उत्तम माध्यम उपलब्ध होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यानजिक निर्माण होणाऱ्या सायन्स पार्कची त्यांनी माहिती जाणून घेतली व तो पूर्ण झाल्यानंतर भेट देण्यास आवडेल असे सांगितले.

नेरूळ येथील रूग्णालयात सुरू असलेल्या कॅन्सर रजिस्ट्री आणि डायलेसिस केंद्राला भेट देऊन सध्याच्या परिस्थितीत कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन महानगरपालिकेने पुढाकार घेत हा अत्यंत महत्वाचा आरोग्य उपक्रम सुरू केल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.

कोपरखैरणे येथील जुनी क्षेपणभूमी बंद करून त्याठिकाणी फुलविलेले निसर्गोद्यान व तेथील मियावाकी शहरी जंगल प्रकल्प अतिशय उल्लेखनीय असल्याचे अभिप्राय त्यांनी दिले. त्याबाजूलाच असलेल्या सी-टेक मलप्रक्रिया केंद्रातून शुध्द केलेल्या सांडपाण्यावर अधिकची टर्शिअरी ट्रिटमेंट करून ते पुनर्प्रक्रियाकृत पाणी उद्योगसमुह, बांधकामे, उद्याने यासाठी वापरण्यात येत असल्याची व त्यातूनही महानगरपालिकेस उत्पन्न प्राप्त होत असल्याची त्यांनी विशेष नोंद घेतली.

# भाजपच्या चाफेकरांनी नाव केले 'रोशन'

## रोहा नगर परिषदेमध्ये २४ वर्षानंतर 'कमळ' फुलले



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषदेच्या निवडणुकीत तब्बल २४ वर्षांनंतर भारतीय जनता पक्षाने खाते उघडत इतिहास रचला आहे. भाजपचे तरुण, तडफदार उमेदवार रोशन चाफेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार समीर सकपाळ यांचा ३१९ मतांनी पराभव करत रोह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

या लढतीत रोशन चाफेकर यांना कोणताही राजकीय वारसा नव्हता. सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या या तरुणाने आत्मविश्वास, जिद्द आणि कामाच्या बळावर चमत्कार घडवून आणला. विशेष म्हणजे पराभव होईल अशी भीती त्यांच्या मनात कधीच नव्हती. ते लढले आणि जिंकलेसुद्धा. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने लोकसंवाद, नागरिकांच्या अडीअडचणी सोडवणे आणि प्रत्यक्ष कामातून विश्वास निर्माण करणे हेच त्यांच्या राजकारणाचे सूत्र राहिले.

निवडणूक जवळ आली म्हणून नव्हे, तर नेहमीच मतदारांच्या संपर्कात राहणारा नेता अशी रोशन चाफेकर यांची ओळख प्रभागात निर्माण झाली होती. विशेषतः प्रभाग क्रमांक ९मध्ये शासकीय योजनांचा लाभ मतदारांपर्यंत पोहचवणे, वैयक्तिक प्रश्नांमध्ये तत्पर मदत आणि प्रत्येक सुख-दुःखात सहभागी राहणे यामुळे त्यांनी मतदारांची मने आधीच जिंकली होती.

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचा आशीर्वाद आणि सहकार्य रोशन चाफेकर यांना सातत्याने लाभत राहिले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, रायगड जिल्हा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, महामंत्री सतीश धारप, दक्षिण जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील यांचे मार्गदर्शन या विजयामागे महत्त्वाचे ठरले.

भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांचे उत्तम नियोजन, काटेकोर रणनीती आणि पूर्ण ताकदीने केलेले काम निर्णायक ठरले. प्रचार यंत्रणा मजबूत ठेवत प्रत्येक स्तरावर संघटनात्मक ताकद लावण्यात आली होती तसेच या यशामागे रोशन चाफेकर यांच्या सर्व सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने आणि कार्यकर्त्यांनी निष्ठेने व एकदिलाने केलेले परिश्रम मोलाचे ठरले. प्रचारापासून मतदानाच्या दिवशीपर्यंत प्रत्येकाने प्रामाणिकपणे काम करत या विजयात आपला खारीचा वाटा उचलला आहे.

या यशाबद्दल तालुकाभरातून रोशन चाफेकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वाने या विजयाचे विशेष कौतुक केले आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनीही त्यांचे अभिनंदन केले आहे.

विजयानंतर प्रभाग क्रमांक ९मधील प्रत्येक सोसायटीत, घराघरातून तसेच त्यांच्या कार्यालयात नागरिक स्वतःहून येऊन रोशन चाफेकर यांना शुभेच्छा देत आहेत. विजयाबद्दल अभिनंदन करताना नागरिकांकडून त्यांच्या कामाचे मनापासून कौतुक केले जात आहे.

# सहकारी पतसंस्थांचे प्रशिक्षण शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित, अलिबागच्या वतीने लोणावळा येथील बॅसिलिका हॉटेल येथे वसूल न झालेली कर्जाची रक्कम या विषयावर दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कार्पोरेट को-ऑपरेटिव्ह कन्सल्टंट, कोच ट्रेनर व लेखक संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण शिबिरात जिल्हा महासंघाच्या १५ सभासद पतसंस्थांचे एकूण ५८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. अलिबाग, मुरुड, उरण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव व महाड या तालुक्यांमधून प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन ॲड.जे.टी. पाटील, अध्यक्ष, रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघ मर्यादित, अलिबाग व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान वसुली व्यवस्थापन आर्थिक शिस्त, संस्थात्मक स्थैर्य आणि सहकारातील आव्हानाना सामोरे जाण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी महासंघाचे सचिव योगेश मगर, महासंघ संचालक मंडळ व कर्मचारीवर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले. प्रशिक्षणार्थींनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त करीत भविष्यातही अशा प्रकारचे उपयुक्त प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

# श्रीवर्धनमध्ये शिवसेना नगरसेवकांचा सत्कार



**श्रीवर्धन : बातमीदार**

नुकत्याच झालेल्या श्रीवर्धन नगर परिषदेच्या निवडणुकीत विजयी आलेल्या शिवसेनेच्या दोन नगरसेवकांचा सत्कार वडघर पांगळोली येथील स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये संस्थापक दीपक जोशी यांच्या हस्ते करण्यात आला.

शिवसेनेचे दोन्ही माजी शहरप्रमुख संतोष वेश्वीकर आणि देवेंद्र भुसाणे हे नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. शिवसेनेच्या महिला उमेदवार सलोनी मोहित या काही कारणास्तव उपस्थित राहू शकल्या नाहीत. या कार्यक्रमास उमरोठकर गुरुजी, ॲड. संजीव डेगवेकर आदी उपस्थित होते.

# रोहा येथे कुणबी समाज वधू-वर परिचय मेळावा

**धाटाव : प्रतिनिधी**

कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई संलग्न ग्रामीण शाखा रोहाच्या वतीने रविवारी २८ डिसेंबर रोजी स्व.आ.पा.रा. सानप कुणबी भवन सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत समाज वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नाव नोंदणी व अधिक महितीसाठी रामचंद्र सकपाळ ८४४६६७१७१, अनंता थिटे ९९७०३९१६१२, सतिश भगत ७७९८५१२६२६, सुहास खरीवले ९६६५१६९६६६, मुकेश भोकटे ९९२३२७२००१, शैलेश बाधीत ९०११६९७१६३, रवींद्र शिंदे ८४०८०५३००५, महेश तुपकर ९८२२३९३३७३, दीपिका भगत ९२७२७४७४६३, शिल्पा मरवडे ७६२०७०६१२४, आशा शिर्के ९३५६९६५५५४, जिज्ञासा तुपकर ९२७०६३४९९७, वसंत मरवडे ७७७६९३७४६५, शशिकांत कडू ८९८३६३८४९४, संतोष भोईर ९८६०४७४२१८, सपना रटाटे ९२७२९३७७६३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेरळमध्ये 'विहिंप'चे मातृशक्ती संमेलन

**कर्जत : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषदेच्या कोकण प्रांताचे मातृशक्ती संमेलन नेरळ येथे आयोजित करण्यात आले होते. यातील एका चर्चासत्रात केंद्रीय धार्मिक प्रचार प्रमुख ॲड. दीपक गायकवाड यांनी हिंदू धर्म धोक्यात आला असून हिंदू अल्पसंख्याक होण्याची भीती व्यक्त केली.

नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात झालेल्या या संमेलनाच्या उद्घाटन समारंभास मातृशक्ती केंद्र प्रमुख कविता अग्रवाल, सहसंयोजक उज्ज्वला शेट्टी, विश्व हिंदू परिषद रायगड विभागाचे मंत्री प्रसन्न खेडकर, जिल्हा मंत्री साईनाथ श्रीखंडे, सेवा विभाग प्रमुख दिलीप कवडकर, प्रांतीय विमर्श सदस्य ॲड. अमोल सूर्यवंशी, ॲड. श्याम कडव, प्रखंडमंत्री अनंत हजारे, विनया काकडे आदी उपस्थित होते.



कोकण प्रांत मातृशक्ती सहसंयोजक उज्ज्वला शेट्टी यांनी बाल संस्कारवर्गाचे महत्त्व स्पष्ट केले. बाल संस्कार कसे करावे याबद्दल मुलांसोबत एक प्रात्यक्षिक आयोजित केले गेले. यामध्ये विधी, प्रेरणादायी गाणी, उपदेशात्मक कथा आणि खेळ यांचा समावेश होता.

समारोप सत्रात केंद्रीय धार्मिक प्रचार प्रमुख अधिवक्ता दीपक गायकवाड यांनी हिंदू धर्माची फसवणूक होत असून आपण अल्पसंख्याक होण्याच्या मार्गावर आहोत, असे सांगितले. ब्लॉक अध्यक्ष उमा डोंगरे यांनी आभार मानले.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन





**पेण : प्रतिनिधी**

आयुष्य किंवा शालेय जीवनात घेतलेल्या परिश्रमामुळे यशाचे ध्येय आपोआप गाठता येते, असा मोलाचा सल्ला अभिनेत्री, नृत्यांगना व गायिका आलापिनी निसळ यांनी विद्यार्थ्यांना दिला. पेणमधील भाऊसाहेब नेने महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक समारंभ विद्यालयाच्या प्रांगणात झाला. या समारंभाचे उद्घाटन अभिनेत्री निसळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

या समारंभास संस्थेचे अध्यक्ष ॲड मंगेश नेने, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, चिटणीस सुधीर जोशी, सदस्य वसंत आठवले, सदस्य डॉ. नीता कदम, समीर साने, घनश्याम देव, प्राचार्य सदानंद धारप, कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद चिटणीस आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना अभिनेत्री आलापिनी निसळ यांनी आयुष्यात प्रत्येकाला आपल्यातील कलागुणांना सादर करण्याची संधी मिळत असते, असे सांगून आई-वडिलांच्या पाठबळामुळे माझा आतपर्यंतचा प्रवास यशस्वीरित्या झाल्याचे सांगितले. स्पर्धेत यश मिळेल का याचा विचार करण्यापेक्षा त्या स्पर्धेत भाग घेणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत घेतल्यावर आपल्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, असेही त्यांनी म्हटले.

अध्यक्षीय भाषणात ॲड. मंगेश नेने यांनी शालेय स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच ज्यांना बक्षीस मिळाले नाही त्यांनी पुढील वर्षी अधिक प्रयत्न करा, असे सांगितले.

शैक्षणिक, क्रीडा तसेच एनएसएस शिबिरात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना या वेळी मान्यवरांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# पोलादपुरात हरिपाठ महोत्सव रंगला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर येथे हरिपाठ महोत्सव रंगला. या दोन दिवसीय हरिपाठ महोत्सवाचे आयोजन विकास गोगावले मित्र मंडळ आणि सिद्धेश शेठ युवामंच यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

महोत्सवाचे उद्घाटन माजी राजिप सभापती सुषमा गोगावले यांच्या हस्ते झाले. महोत्सवात १२ हरिपाठ भजनी मंडळांनी सहभाग घेतला. हभप यशवंतमहाराज खामकर आणि हभप दीपकमहाराज दसवडकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी बजावली.

या महोत्सवात ढवळेतील माऊली कृपा भजनी मंडळाने विजेतेपद पटकाविले. बोरजचे संत ज्ञानेश्वर महाराज भजनी मंडळ द्वितीय, कोतवालचे कै.रामचंद्र महाराज पार्टे हरिपाठ मंडळ तृतीय, सडवलीच्या विठ्ठल रखुमाई भजनी मंडळाला चतुर्थ, तर उत्तेजनार्थ पारितोषिक करंजे येथील जननी कुंभजाई भजन मंडळाला जाहीर करण्यात आले.

यावेळी हभप यशवंतमहाराज खामकर यांनी भैरवी, तर हभप दीपकमहाराज दसवडकर यांनी पखवाजचे सोलोवादन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

बक्षीस वितरण समारंभाला सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, भाजप उपाध्यक्ष मनोज भागवत, नायक मराठा समाज तालुकाध्यक्ष सुनील मोरे, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगराध्यक्ष स्नेहा मेहता, भाजप तालुका अध्यक्ष वैभव चांदे, कापडे सहसंपर्क प्रमुख के.के. तथा कृष्णा कदम, डॉ. संजय शेठ, डॉ. निलेश कुंभार, निवृत्तीमहाराज मोरे, माजी सरपंच भरत चोरगे, नगरसेवक नागेश पवार, विनायक दीक्षित, सरपंच संघटनेचे अध्यक्ष राकेश उतेकर, बांधकाम कामगार सेना तालुका अध्यक्ष दत्ता मोरे, हभप अनंत घाडगे, युवासेना शहर अधिकारी प्रसाद मोरे, नरेश सलागरे, राजेश डांगे, स्वप्नील चोरगे आदी उपस्थित होते.







**मुरूड : सकाळच्या वेळी गुलाबी थंडीत सूर्योदय पाहाण्यासाठी पर्यटक एकदरा पुलावर येतात व सोनेरी किरणांमध्ये चालण्याचा आनंद घेतात.** (छाया : सुधीर नाझरे)

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा
राम प्रहर

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड,**

**खरीप पणन हंगाम २०२५-२६ व २०२६-२७ साठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान/सीएमआरच्या वाहतूकीचे दर निश्चतीसाठी ई-निविदा सूची**

जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र शासन, अनुभवी निविदाधारकांना स्पर्धात्मक बोली प्रस्तावांना प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत.

तपशिलवार निविदा दस्ताऐवजासाठी इंच्छुक बोलीदारांनी https://www.mahatenders.gov.in/nicgep/app व www.raigad.gov.in या वेबसाईटवर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदेत सहभागी होण्यासाठी संगणकीय नोंदणी करुन आवश्यक माहिती अपलोड करण्याचा कालावधी दि. २४/१२/२०२५ ते दि. ०६/०१/२०२६ रोजी दुपारी / सायं. ०६.०० वा. पर्यंत आहे.

जिल्हाधिकारी रायगड यांचे मान्यतेने.

**सही/-**
**(दिपाली ब्राम्हणकर)**
**सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी**
**रायगड- अलिबाग**

**क्र. जिमाका/राअ/जाहि/३२४/२०२५-२०२६**

## विजय हजारे चषक स्पर्धेत धावांची आतषबाजी

# एका दिवसात २१ शतके!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विजय हजारे चषक स्पर्धेतील पहिला बुधवारचा दिवस दिग्गज, अनुभवी, युवा खेळाडूंच्या धुवांधार शतकांनी गाजवला. दिवसभरात झालेल्या १९ सामन्यांत ओडिशाच्या स्वस्तिक समलने शानदार द्विशतक झळकावले, तर एकूण २१ जणांनी तडफदार शतके फटकावली.

एकीकडे वैभव सूर्यवंशीने अवघ्या ५९ चेंडूंत दीडशे धावा टोलवल्या तर दुसरीकडे विराट कोहलीने आंध्र प्रदेशविरुद्ध १३१ धावा जमवताना लिस्ट ए क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा पार केला. जयपूरमध्ये सिक्कीमविरुद्ध रोहित शर्मानेही १५५ धावांची तोडफोड खेळी साकारत दिवसातील आणखी एक शतक झळकावले.



शतक झळकविणाऱ्यांमध्ये स्नेहल कवठणकर (गोवा), शुभम खजुरिया (जम्मू-काश्मीर), विष्णू विनोद (केरळ), इशान किशन (झारखंड), देवदत्त पडिक्कल (कर्नाटक), यश दुबे (मध्य प्रदेश), वैभव सूर्यवंशी, आयुष, सकिबूल गनी (बिहार), रिकी भुई (आंध्र), विराट कोहली (दिल्ली), अमन मोखडे, ध्रुव शोरे (विदर्भ), स्वस्तिक समल, बिपलब समंत्राय (ओडिशा), सम्मर गज्जर (सौराष्ट्र), हिमांशू राणा (हरियाणा), रवी सिंग (रेल्वे), फेरोईजम जोतिन (मणिपूर), अर्पित भटेवरा, किशन लिंगडोह (मेघालय) यांचा समावेश आहे.

वैभव सूर्यवंशीने अवघ्या ८४ चेंडूंत १६ चौकार, १५ षटकारांसह १९० धावांची आतषबाजी केल्यानंतर बिहारने विजय हजारे करंडक (२०२५-२६) प्लेट लीग स्पर्धेत अरुणाचल प्रदेशचा निर्धारित ५० षटकांत ६ बाद ५७४ धावांचा डोंगर उभारत 'लिस्ट-ए' क्रिकेटमधील सर्वोच्च सांघिक धावसंख्येचा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. बिहारने हा सामना चक्क ३९७ धावांच्या एकतर्फी फरकाने जिंकला. अरुणाचलचा डाव अवघ्या १७७ धावांत आटोपला.

बिहारच्या या ऐतिहासिक विजयाचा पाया १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीने रचला. वैभवने अवघ्या ३६ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले. हे त्याचे वरिष्ठ स्तरावरील (टी-२० वगळता) पहिलेच शतक ठरले. त्याने अवघ्या ५९ चेंडूंत १५० धावांचा टप्पा पार करून दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिव्हिलियर्सचा (६४ चेंडू, विंडीजविरुद्ध, २०१५) विक्रम मोडीत काढला.

### साकिबूल गनीची वेगवान सेंच्युरी

वैभवच्या विक्रमानंतर काही वेळातच बिहारचा कर्णधार साकिबूल गनीने अवघ्या ३२ चेंडूंत शतक झळकावत अनमोलप्रीत सिंगचा (३५ चेंडू) विक्रम मोडीत काढला. गनीने अवघ्या ४० चेंडूंत १० चौकार आणि १२ षटकारांसह १२८ धावा कुटल्या. यष्टिरक्षक-फलंदाज आयुष लोहारुकानेही ५६ चेंडूंत ११६ धावांचे योगदान दिले, तर पीयूष सिंगने ६६ चेंडूंत ७७ धावांची खेळी केली. अरुणाचल प्रदेशचे मिबोम मोसू (०/११६), सूर्यांश सिंग (०/९८), तडाकामल्ला मोहित (२/९९), धीरज अंतीन (१/८१) आणि तेची नेरी (२/८३) हे सर्वच गोलंदाज महागडे ठरले.

# आयसीसी वनडे रँकिंगमध्ये सरस कोण?

## नव्या वर्षात भारत-न्यूझीलंडमध्ये रंगणार मालिका

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला पुढील महिन्यापासून सुरुवात होत आहे. न्यूझीलंडचा संघ भारत दौऱ्यावर येणार असून, दोन्ही संघांचे रँकिंग पाहता ही मालिका अत्यंत चुरशीची आणि रोमांचक होण्याची चिन्हे आहेत.

भारतीय क्रिकेट संघ नव्या वर्षाची सुरुवात न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेने करणार आहे. ११ जानेवारीपासून या तीन सामन्यांच्या मालिकेचा थरार पहायला मिळेल. सध्या कोणतीही मोठी आयसीसी स्पर्धा नसली तरी विराट कोहली आणि रोहित शर्मा यांसारखे दिग्गज खेळाडू पुन्हा एकदा मैदानात परतणार असल्याने या मालिकेबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. या मालिकेसाठी अद्याप भारतीय संघाची अधिकृत घोषणा झालेली नाही, मात्र लवकरच संघ निवड होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

भारत आणि न्यूझीलंडच्या आयसीसी क्रमवारीचा विचार केल्यास दोन्ही संघ एकमेकांच्या अगदी जवळ आहेत. सध्याच्या आयसीसी वनडे रँकिंगमध्ये भारतीय संघ १२१ रेटिंग पॉइंट्ससह पहिल्या स्थानावर विराजमान आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर न्यूझीलंडचा संघ असून त्यांचे ११३ रेटिंग पॉइंट्स आहेत. जरी टीम इंडियाच्या पहिल्या स्थानाला तूर्तास कोणताही धोका नसला, तरी आगामी मालिकेत न्यूझीलंडने सरशी मिळवल्यास ते भारताच्या रेटिंग पॉइंट्सच्या अधिक जवळ पोहचू शकतात.

# क्रिकेट स्पर्धेत झिराड संघ विजेता



**रेवदंडा : प्रतिनिधी**

आग्राव येथे मरीआई क्रिकेट संघाच्या वतीने आणि अ‍ॅड. सचिन राऊळ यांनी पुरस्कृत केलेल्या क्रिकेट स्पर्धेत साई स्पोर्ट्‌र्स झिराड संघाने प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत एकूण २४ संघाना थेट प्रवेश देण्यात आला होता. व्दितीय क्रमांक व्हीसीएन कुरूळ, तर तृतीय क्रमांक सँडी स्पोर्ट्स अलिबाग संघाने प्राप्त केला. मालिकावीर प्रसाद म्हात्रे (कुरूळ), उत्कृष्ट फलदांज सचिन म्हात्रे आणि उत्कृष्ट गोलदांज प्रशांत म्हात्रे (दोघेही झिराड) ठरले. विजेत्यांना रोख रक्कम व चषक, तर वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना चषक व सायकल अशी बक्षिसे देण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभार स्पर्धेचे पुरस्कर्ते डॉ. सचिन राउळ, ज्येष्ठ शिवसेना कार्यकर्ते नारायण मुंबईकर, अशोक गुरव, प्रशांत शेणवईकर, सिद्धेश शेवणईकर, चौल शिवसेना महिलाप्रमुख ज्योती मुंबईकर, शैलेश मुंबईकर आदी उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचालन व समालोचन यासीन मर्चंट व इम्रान बुखारी यांनी केले, पंचाचे काम नितेश नरहरी व कल्पेश म्हात्रे यांनी पाहिले, तर स्कोअरची जबाबदारी दरणे यांनी बजावली.

# इंग्लंडचा प्रशिक्षक म्हणून रवी शास्त्री योग्य!

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा अवघ्या ११ दिवसांत अ‍ॅशेस मालिकेत पराभव झाल्यानंतर संघ व्यवस्थापनात मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण जाली आहे. इंग्लंड संघाचे मुख्य प्रशिक्षक ब्रॅंडन मॅक्युलम हे सध्या रडारवर असून त्यांच्या कामगिरीचे युद्धपाकळीवर मूल्यमापन होत आहे.

मॅक्युलमच्या बॅझबॉल रणनितीवर आता शंका घेतली जाऊ लागली असून त्याचे इंग्लंड संघासोबतचे भविष्य आता अधांतरी झाले आहे. अशा परिस्थितीत इंग्लंडचा माजी फिरकी गोलंदाज मॉंटी पनेसरने इंग्लंडच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी रवी शास्त्रींचे नाव सुचवून एका वेगळ्याच चर्चेला तोंड फोडले आहे.

### मॉंटी पनेसरची 'गुगली'



इंग्लंड क्रिकेट बोर्डाने २०२२ मध्ये ब्रॅंडन मॅक्युलमची इंग्लंच्या कसोटी संघाचा हेड कोच म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर त्याने बॅझबॉल म्हणजे अत्यंत आक्रमक क्रिकेट खेळण्याची रणनिती अवलंबली. सुरुवातीच्या काळात इंग्लडने या रणनितीच्या आधारे देदीप्यमान यश मिळवले. त्यांनी त्या काळात ११पैकी १० सामन्यात विजय मिळवला.

आता मात्र इंग्लंड संघाची दिवसेंदिवस कामगिरी खालावत चालली आहे. त्यांना ऑस्ट्रेलिया किंवा भारताविरूद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत यश मिळवता आलेले नाही. त्यांनी ३३ पैकी १६ सामने गमावले आहेत. सध्या सुरू असलेल्या अ‍ॅशेस मालिकेचादेखील यात समावेश आहे. ते सध्या मालिकेत ०-३ने पिछाडीवर आहेत. मालिकेतील अजून दोन सामने शिल्लक आहेत.

> ऑस्ट्रेलियाला कसे हरवायचे हे कोणाला नेमके माहिती आहे याचा तुम्हाला विचार करावा लागले. ऑस्ट्रेलियाच्या कच्च्या दुव्यांचा कशा प्रकारे फायदा उचलायचा हे माहिती हवे. मानसिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या आणि रणनैतिकदृष्ट्या हे कसे करायचे हे माहिती हवे. मला वाटते रवी शास्त्री हे इंग्लंडचे पुढचे कोच होण्यासाठी अत्यंत योग्य व्यक्ती आहेत.
>
> **-मॉंटी पनेसर,** इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू

दरम्यान, इंग्लंडचा माजी खेळाडू पनेसरने पत्रकार रवी बिश्त यांच्या युट्यूब चॅनलला मुलाखत दिली. त्या वेळी बोलताना पनेसरने इंग्लंडचा प्रशिक्षक म्हणून त्याला रवी शास्त्री योग्य असून ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच मायभूमीत पराभूत करण्यासाठी काय करावे लागेल हे त्यांना चांगले माहिती आहे, असे म्हटले.


रवी शास्त्रींच्या मार्गदर्शनाखाली भारताने ऑस्ट्रेलियाला त्यांच्यात भूमीत दोनवेळा पराभूत केले आहे. पहिल्यांदा २०१८-१९मध्ये त्यांनी पहिल्यांदा ऑस्ट्रेलियात मालिका जिंकली. त्यानंतर २०२०-२१मध्ये तोच कित्ता गिरवला.


# 'खेलरत्न'साठी हार्दिकला, तर दिव्या देशमुखसह २४ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारासाठी नामांकन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय पुरुष हॉकी संघाचा उपकर्णधार हार्दिक सिंग याची यंदाच्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. दुसरीकडे युवा विश्वचषक विजेती बुद्धिबळपटू दिव्या देशमुख, डेकॅथलिट तेजस्विन शंकर यांच्यासह एकूण २४ खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी नावे सुचवण्यात आली आहेत. पुरस्कार निवड समितीच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

भारतीय हॉकी संघातील स्टार आणि मध्यरक्षक हार्दिक हा टोकियो ऑलिम्पिक २०२१ आणि पॅरिस ऑलिम्पिक २०२४मध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा सदस्य होता. या वर्षी आशिया चषक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय संघातही त्याचा समावेश होता. पाच वर्षांनी प्रथमच योगासन खेळाडू आरती पाल हिची अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली. आरती राष्ट्रीय व आशियाई चॅम्पियन आहे.





दिव्या देशमुख ही विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली. बुद्धिबळपटू विदित गुजराती आणि डेकॅथलिट तेजस्विन शंकर यांचीही शिफारस झाली आहे. तेजस्विनने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२३मध्ये रौप्यपदक जिंकले होते आणि या वर्षी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतही दुसरे स्थान मिळवले होते. दोन वेळा विश्व अजिंक्यपद कांस्यपदक विजेती रायफल नेमबाज मेहुली घोष, जिम्नॅस्ट प्रणती नायक तसेच भारताची क्रमांक एक महिला बॅडमिंटन जोडी त्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद यांचीही नावे या शिफारशीत आहेत. विशेष म्हणजे या यादीत कोणत्याही क्रिकेटपटूचा समावेश नाही.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार नामांकन : हार्दिक सिंग (हॉकी)

अर्जुन पुरस्कार नामांकन : तेजस्विन शंकर, प्रियांका (दोघेही अ‍ॅथलेटिक्स), नरेंद्र (मुष्टियुद्ध), विदित गुजराती, दिव्या देशमुख (दोघेही बुद्धिबळ), धनुष श्रीकांत (मूकबधिर नेमबाजी), प्रणती नायक (जिम्नॅस्टिक्स), राजकुमार पाल (हॉकी), सुरजीत (कबड्डी), निर्मला भाटी (खो-खो), रूद्रांक्ष खंडेलवाल (पॅरा नेमबाजी), एकता भयान (पॅरा अ‍ॅथलेटिक्स), पद्मनाभ सिंग (पोलो), अरविंद सिंग (नौकायन), अखिल श्योराण (नेमबाजी), मेहुली घोष (नेमबाजी), सुतीर्था मुखर्जी (टेबल टेनिस), सोनम मलिक (कुस्ती), आरती पाल (योगासन), त्रिसा जॉली (बॅडमिंटन), गायत्री गोपीचंद (बॅडमिंटन), लालरेम्सियामी (हॉकी), मोहम्मद अफजल (अ‍ॅथलेटिक्स), पूजा (कबड्डी).

### सामन्यादरम्यान रोहित शर्माला वडापावची ऑफर; मजेशीर रिॲक्शन

**जयपूर : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा टी-२० आणि कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर फक्त वनडेत सक्रीय आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेनंतर तो देशांतर्गत विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले. मुंबई विरुद्ध सिक्कीम यांच्यातील लढतीत रोहितची जबरदस्त क्रेझ पहायला मिळाली.

सात वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफीत पुनरागमन करत रोहितने दीडशतकी खेळी करत चाहत्यांची मने जिंकली. याच सामन्यात क्षेत्ररक्षण करत असताना एका चाहत्याने रोहितला थेट 'वडापाव खाणार का?' असा सवाल केला. यावर रोहित शर्मानं हातवारे करून त्या चाहत्याला नको असा रिप्लाय दिला.

# कराटे चॅम्पियनशिपमध्ये रोह्यातील झेन मार्शल आर्ट्स स्कूल इंडियाची चमक



**रोहा : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सेशिंकाई युनियनची मान्यता असलेल्या रोह्यातील झेन मार्शल आर्ट्स स्कूलच्या २२ विद्यार्थ्यांनी चेंबूर (मुंबई) येथील ग्रीन एकर्स अकादमीत झालेल्या महाराष्ट्र गोजू-यू राज्य निवड कराटे चॅम्पियनशिपमध्ये भाग घेतला. सर्व विद्यार्थ्यांनी एकूण ४४ पदके जिंकली. त्यात नऊ सुवर्ण, पाच रौप्य आणि ३० कांस्यपदकांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय स्पर्धा महाराष्ट्र गोजू-यू कराटे-डो असोसिएशनने आयोजित केली होती. सर्व विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट आणि चमकदार कामगिरीला नियमित घेण्यात येणारी इंटर-डोजो चॅम्पियनशिप आणि क्योशी निलेश मनोहर यांनी आयोजित केलेल्या विशेष प्रशिक्षण सत्राचे पाठबळ मिळाले.

विद्यार्थ्यांचे उल्लेखनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले जात असून झेन मार्शल आर्ट्स स्कूलचे प्रशिक्षक ईशा लाड, प्रमोद भगत आणि आयुष मोरे यांच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक होत आहे.

# सांताक्लॉज बनलेल्या विराटचा जुना व्हिडीओ व्हायरल

**कोलकाता : वृत्तसंस्था**

देशभरात ख्रिसमस सण शुक्रवारी उत्साहात साजरा झाला. या दिवशी सांताक्लॉज मुलांना भेटवस्तू देतो असा लहान मुलांचा समज आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीने स्वतः सांताक्लॉज बनत लहान मुलांना गिफ्ट दिल्याचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे.

गेली अनेक वर्षे क्रिकेटच्या मैदानावर धावांचा आणि शतकांचा पाऊस पाडत सर्वांची मने जिंकणारा विराट कोहली लहान मुलांसाठी ख्रिसमसनिमित्त सांताक्लॉज बनला होता. हा जुना व्हिडीओ स्टार स्पोर्ट्सने एक्स अकाउंटवरून शेअर केला आहे. यामध्ये सांताक्लॉज बनून विराटने कोलकाता येथील एका आश्रमातील लहान मुलांना गिफ्ट्स दिले.



२०१९मध्ये विराट कोहलीने या आश्रमाला भेट दिली होती. व्हिडीओमध्ये विराट मुलांच्या इच्छा ऐकताना दिसतो आणि नंतर ख्रिसमसच्या दिवशी सांताक्लॉजच्या वेशात मुलांना भेट देऊन त्यांना भेटवस्तू देतो.

भेटवस्तू मिळाल्यानंतर मुले आनंदी दिसत होती, पण विराटने त्याचा सांताक्लॉजचा पोशाख काढून त्याच्या खऱ्या रूपात दिसल्यावर त्यांचा आनंद द्विगुणित झाला. सर्व मुले त्याला मिठी मारण्यासाठी धावली. हा व्हिडीओ जुना असला तरी तो पुन्हा एकदा चाहत्यांच्या पसंतीला उतरला आहे.

### यंदा चाहत्यांना शतकी गिफ्ट

*विराट कोहली यंदाच्या ख्रिसमसपूर्वी विजय हजारे ट्रॉफी खेळण्यासाठी उतरला होता. २४ डिसेंबरला झालेल्या सामन्यात विराट कोहलीने ८३ चेंडूत शानदार शतक झळकावले आणि चाहत्यांना ख्रिसमसचे छान गिफ्ट दिले. इतकंच नव्हे तर त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १६ हजार धावा पूर्ण करत महान सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रमही मोडला.*







**पनवेल : भाजप-शिवसेना महायुतीने माथेरान नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ता मिळवली असून भाजपच्या विजयी उमेदवारांनी शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची भाजपच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात सदिच्छा भेट घेतली. या वेळी भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, कर्जतचे माजी तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, नेरळ मंडळ अध्यक्ष नरेश मसणे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com